दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

## दिव्यांग लाभार्थ्यांना दोन महिन्यांचा उदरनिर्वाह भत्ता अदा

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त श्री. अमोल येडगे यांच्या निर्देशानुसार दिव्यांग लाभार्थ्यांना माहे ऑगस्ट व सप्टेंबर या दोन महिन्यांचा उदरनिर्वाह भत्ता अदा करण्यात आला आहे. यासाठी महानगरपालिकेकडून एकूण १ कोटी ७१ लाख रुपये निधी वितरित करण्यात आला आहे. या निधीत दिव्यांग लाभार्थ्यांना देण्यात येणारा उदरनिर्वाह भत्ता तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीचा समावेश आहे. या योजनेचा एकूण ७,७५३ लाभार्थ्यांना लाभ झाला आहे. दिव्यांग लाभार्थ्यांना वेळेत आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेकडून ही कार्यवाही करण्यात आली असल्याची माहिती मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. संतोष वाहुळे यांनी दिली.

(वर्ष ६५ वे अंक २३७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.२२ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

# राज्यात दुष्काळाची दाहकता वाढली, आता शरद पवार मैदानात उतरणार

**दुष्काळी भागाचा दौरा**

## २८ सप्टेंबरला शेतकऱ्यांच्या बांधावर

मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) - यंदा राज्यातील अनेक भागांमध्ये पुरेसा पाऊस न पडल्याने दुष्काळाचे संकट उभे ठाकले आहे. ही परिस्थिती ओळखून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना आपापल्या भागातील दुष्काळी परिसरात जाऊन आढावा घेण्याचे आदेश दिले होते. आगामी काळात दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सरकारी यंत्रणांकडून वेगाने उपाययोजना राबवल्या जातील, यादृष्टीने चाचपणी सुरु आहे. अशातच आता राजकारणाचा आणि आपातकालीन परिस्थितीत प्रशासकीय यंत्रणा हाताळण्याचा प्रचंड अनुभव असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी एक महत्त्वाची घोषणा केली आहे.

शरद पवार हे राज्यातील दुष्काळी भागाचा दौरा करणार आहेत. २८ सप्टेंबरला शरद पवार हे दुष्काळी भागाचा दौरा करतील. काही दिवसांपूर्वीच शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर



करण्याची मागणी केली होती. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये ही मदत सुधा जाहीर करावी, अशी मागणी या पत्रात शरद पवार यांनी केली होती. त्यानंतर आता शरद पवार प्रत्यक्ष जमिनीवर उतरुन आणि शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेणार आहेत. या दौऱ्यात शरद पवार काय निरीक्षणे नोंदवणार आणि त्यानंतर सरकारकडे काय मागण्या करणार, हे पाहावे लागेल. तत्पूर्वी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे रविवारपासून शेतात राज्यातील दुष्काळी भागातील दौरा करत आहेत. रोहित पवार हे राज्य सरकारवर सातत्याने टीकेची तोफ डागत आहेत. त्यानंतर आता शरद पवार दुष्काळी दौरा केल्यानंतर काय बोलणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलीकडेच विरोधक हे दुष्काळी परिस्थितीचे राजकारण करत असल्याचा आरोप केला होता. मात्र, शरद पवार यांच्यासारखा बुजुर्ग आणि जुनाजाणता नेता दुष्काळाच्या मुद्द्यावरुन मैदानात उतरल्यास राज्य सरकार आणि मुख्यमंत्री फडणवीस त्याला कशाप्रकारे प्रत्युत्तर देणार, हेदेखील पाहावे लागेल.

एकीकडे शरद पवार दुष्काळी भागाचा दौरा करताना त्यांच्या पक्षाकडून मुंबईत राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. दुष्काळ, बेरोजगारी, पेपर फुटी आणि डखठ वर बैठकीत मंथन होणार आहे. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत बैठक पार पडेल. वाय बी चव्हाण सेंटर येथे सकाळी १० वाजता बैठक पार पडणार आहे. बैठकीला सर्व खासदार, आमदार, प्रदेश पदाधिकारी, निरीक्षक, प्रवक्ते, सर्व जिल्हाध्यक्ष कार्याध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, विधानसभा अध्यक्ष, माजी खासदार, आमदार, लोकसभा विधानसभा उमेदवार, फ्रँटल अध्यक्ष व सेलचे राज्य प्रमुख यांना निमंत्रण देण्यात आले आहे.

**बैठकीतील प्रमुख ६ विषय**

१. महाराष्ट्रातील दुष्काळी व पाणीटंचाईची परिस्थिती आणि त्याचा शेतकरी, ग्रामीण जनतेवर होत असलेला परिणाम.
२. राज्यातील बेरोजगार तरुणांच्या प्रश्नावर पक्षाची भूमिका व पुढील आंदोलनात्मक दिशा.
३. पेपरफुटी व परीक्षांमधील गैरप्रकारामुळे युवकांचे भविष्याचे होणारे नुकसान आणि त्याविरोधातील पक्षाची भूमिका.
४. एसआयआर बाबत सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी यांनी दक्षतेने करावयाची कामे.
५. राज्यातील राजकीय सद्य परिस्थितीचा आढावा.
६. पक्ष वाढीसाठी चर्चा करणे.

# दुष्काळात तेरावा महिना! मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात

मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) - एकीकडे देशात यंदा सरासरीच्या तुलनेत तब्बल १५ टक्के पावसाची तूट नोंदवली गेली असतानाच, आता हवामान विभागाने मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाल्याची अधिकृत घोषणा केली आहे. २१ सप्टेंबरपासून नैऋत्य मोसमी वारे राजस्थान, हरियाणा आणि पंजाबच्या काही भागांतून माघारी फिरले आहेत. एका बाजूला मान्सून काढता पाय घेत असताना, दुसरीकडे महाराष्ट्रात मात्र पुढील तीन दिवस विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

भारतीय हवामान शास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली आणि राजस्थानच्या बहुतांश भागांतून मान्सून माघारी फिरण्यासाठी अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. येत्या २ ते ३ दिवसांत सौराष्ट्र-कच्छ, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि पश्चिम उत्तर प्रदेशातूनही मान्सून काढता पाय घेईल. मात्र, यंदा मोसमी पावसाने अनेक भागांत दांडी मारल्याने देशात १५ टक्के तुटीसह 'दुष्काळात तेरावा महिना' अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

'येलो अलर्ट': गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, हिंगोली, परभणी, नांदेड, नाशिक (घाटाचा भाग), अहिल्यानगर, पुणे (घाटाचा भाग), सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, धाराशिव आणि लातूर.

इतर जिल्हे: ठाणे, रायगड, जळगाव, छत्रपती संभाजीनगर आणि बीड जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळू शकतात.

२२ सप्टेंबर : उद्या, २२ सप्टेंबर रोजी राज्यात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

'येलो अलर्ट': विदर्भातील सर्व जिल्हे (गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, अमरावती, अकोला, बुलढाणा, हिंगोली, वाशीम, यवतमाळ), नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर (घाट परिसर) आणि कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.

इतर जिल्हे: नाशिक, पालघर, मुंबई, ठाणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि जालन्यात ढगाळ वातावरणासह तुरळक सरी पडू शकतात.

२३ सप्टेंबर: २३ सप्टेंबरपासून राज्यातील पावसाचा जोर काहीसा ओसरण्यास सुरुवात होईल. मात्र, दक्षिण महाराष्ट्रातील काही भागांत पावसाची शक्यता कायम राहील, तर उर्वरित महाराष्ट्रात हवामान प्रामुख्याने कोरडे किंवा ढगाळ राहण्याचा अंदाज आहे.

# मंगलप्रभात लोढांनी जैन समाजाचा आवाज दाबलाय - मुनी निलेशचंद्र महाराज

मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) - राज्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा हे मुंबईतील जैन समाजाचा आवाज दाबत असल्याचा आरोप मुनी निलेशचंद्र महाराज यांनी केला आहे. मुंबईत रविवारी एका कार्यक्रमात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि मुनी निलेशचंद्र महाराज यांची आठ महिन्यानंतर पुन्हा भेट झाली. आठ महिन्यांपूर्वी आझाद मैदानावरील जैन समाजाच्या आंदोलनात कबुतरांना न्याय मिळेल असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, अजूनही मुंबईतील सर्व कबुतरखाने बंदच असल्याचा आरोप मुनी निलेशचंद्र यांनी केला. पायधुनी येथील गोडीजी पार्श्वनाथ जैन मंदिरासह सर्व कबुतरखान्यांमध्ये दाणा-पाणी बंद आहे. कालच्या भेटीत त्यांनी राहुल नार्वेकर यांच्यासमोर हा मुद्दा पुन्हा मांडत लवकर न्याय देण्याची मागणी केली. कबुतरखाने तात्काळ उघडले नाहीत तर गोडीजी मंदिरासमोर मोठं आंदोलन आणि आमरण उपोषण करू, यावेळी ऐकणार नाही, जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच राहील, असा इशारा मुनी निलेशचंद्र यांनी दिला.

यावेळी मुनी निलेशचंद्र महाराज यांनी मंगलप्रभात लोढा यांच्यावरही टीकास्त्र सोडले. मंगल प्रभात लोढा यांनी जैन समाजाचा आवाज दाबला आहे. आपण यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देऊ. त्यानंतरही कबुतरखाने सुरु झाले नाही तर गोडीजी मंदिरासमोर मोठं आंदोलन करु, असे मुनी निलेशचंद्र महाराज यांनी म्हटले. यावर आता मंगलप्रभात लोढा किंवा भाजप पक्षाकडून कोणती प्रतिक्रिया देण्यात येणार का, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

जैन धर्मियांची काशी असलेल्या शिरपूर जैन येते अंतरिक्ष पार्श्वनाथ श्वेतांबर पंथीय भाविकांकडून दिगंबर समाजाच्या पूज्य मूर्तीला बाधा आणून विटंबना करण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप दिगंबर जैन समाजाने केला आहे. या घटनेमुळे शिरपूर जैनमध्ये धार्मिक वातावरणात तणाव निर्माण झाला असून,घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दशलक्षण पर्वात अंतरिक्ष पार्श्वनाथांची मूर्ती बाधित? विटंबनेच्या आरोपा नंतर दिगंबर समाजा कडून श्वेतम्बर समाजाच्या भाविकावर गंभीर आरोप करत कारवाईची मागणी करत दिगंबर पंथाच्या शेकडो भाविकांनी शिरपुर पोलीस ठाण्यावर मूक मोर्चा काढत निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे.

अंतरिक्ष पार्श्वनाथ तीर्थक्षेत्रात दिगंबर समाजाच्या दशलक्षण पर्वा दरम्यान भगवान मुनिसुव्रतनाथ स्वामी यांच्या संगमरवरी मूर्तीला बाधा आणण्याचा व विटंबना करण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप दिगंबर जैन समाजाने केला. १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते ८.३० वाजेदरम्यान हा प्रकार घडल्याचे तक्रारीत सांगण्यात आलाय.

पान ३ वर...

# व्यापारी बँकांचा 'झोल' अन् साडेपाच लाख शेतकरी ताटकळले!

मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) - यंदा सहकार विभागाकडून साडे पाच लाख शेतकऱ्यांची यादी ४ ते ५ बँकांना परत पाठवण्यात आली आहे. बँकांकडून कर्जदार शेतकऱ्यांच्या व्याज आकारणीत वाढ करणे, बँक खात्याचा तपशील आणि कर्ज प्रकरणात तफावत दिसणे यामुळे यादी परत पाठवल्याची सूत्रांची माहिती आहे. बँकांनी सरकारकडून अतिरिक्त निधी पदरात पाडून घेण्यासाठी चुकीच्या पद्धतीने व्याज आकारणी केल्याचा सहकार विभागाला संशय आहे. शासनाला या चुकीच्या व्याज आकारणीचा कोट्यवधी रुपयांचा भुर्दंड सोसावा लागू नये यासाठी सहकार विभागाचे लेखापरीक्षक प्रत्येक खात्याची सखोल तपासणी करणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

संबंधित शेतकऱ्यांची यादी ही २ लाखाचा आतील थकीत कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांची यादी आहे. २ लाखाच्या आतील थकीत तब्बल २१ लाख शेतकऱ्यांना आतापर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. बँकेकडून यादी दुरुस्त करून आल्यानंतर उरलेल्या ५.५० लाख शेतकऱ्यांना देखील कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. २ लाखाच्या आतील एकूण २६ लाख ५० हजार शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तर २ लाखावर थकीत असणाऱ्या २ लाख ९० हजार शेतकऱ्यांना देखील लवकरच कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे.

राज्य सरकारने ५६ लाख शेतकऱ्यांसाठी ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केली असून, आतापर्यंत विविध टप्प्यांत लाभार्थींच्या खात्यावर निधी वर्ग करण्यात आला आहे. मात्र, पुढील टप्प्यातील सुमारे पाच ते साडेपाच लाख लाभार्थ्यांच्या यादीत मुख्यतः व्यापारी बँकांशी संबंधित शेतकरी आहेत. या बँकांनी सादर केलेल्या 'डेटा'ची सहकार खात्याकडील उपलब्ध आकडेवारीशी तुलना केली असता, शेतकऱ्यांची प्रत्यक्ष थकबाकी आणि बँकांनी दाखवलेली थकबाकी यामध्ये मोठा फरक आढळून आला आहे, अशी माहिती समोर आली आहे.

**बनावट यादी तयार करून पसरवणाऱ्यावर कारवाई**

दुष्काळग्रस्त जिल्ह्याची किंवा भागाची शासनाकडून अद्याप कुठलीही यादी प्रकाशित करण्यात आलेली नाही. शेतकऱ्यांनी कुठल्याही बनावट यादीवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलं आहे. तर बनावट यादी तयार करून पसरवणाऱ्या वर चौकशी करून कारवाई करण्यात येईल असं आश्वासन देखील त्यांनी दिलंय. गेल्या काही दिवसांपासून राज्यात दुष्काळग्रस्त जिल्ह्यांची यादी तयार करून ती व्हायरल करण्यात येत आहे. यामुळे शेतकरी आणि सर्वसामान्यांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. अशी यादी कुणीही पसरवू नये कारण हा शेतकऱ्यांच्या भावनेशी खेळ आहे, राज्य सरकारकडून अद्याप दुष्काळग्रस्त जिल्ह्यांची कुठलीही यादी प्रकाशित करण्यात आलेली नाही. समाज माध्यमात जी यादी व्हायरल होत आहे ती बनावट असून शेतकऱ्यांनी यावर विश्वास ठेवू नये.' असं आवाहन राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल खामगाव येथे केलं. शिवाय अशी यादी तयार करून पसरवणाऱ्या विरुद्ध चौकशी करून कार्यवाही करण्यात येईल असाही इशारा त्यांनी दिला.

# आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला ६ मेडल्स : ४ रौप्य, २ कांस्य

नवी दिल्ली, दि. २१ (वृत्तसंस्था) - जपानमधील नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने सहा पदके जिंकली आहेत. यापैकी पाच पदके नेमबाजांनी मिळवली, तर एक पदक 'मिक्स्ड मार्शल आर्ट्स' प्रकारात जिंकले गेले. सोमवारी, पुरुषांच्या १० मीटर रायफल प्रकारात हिमांशू ढिल्लन (२५२.४ गुण) याने रौप्य आणि रुद्राक्ष पाटील (२३०.९ गुण) याने कांस्य पदक जिंकले. चीनच्या शेंग लिहाओ (२५४.२ गुण) याने सुवर्णपदक पटकावले.

**भारत १० व्या क्रमांकावर**

आशियाई क्रीडा स्पर्धेच्या पदक तालिकेत भारत एकूण दोन पदकांसह (ज्यामध्ये चार रौप्य पदकांचा समावेश आहे) १० व्या स्थानावर आहे. १४ सुवर्णपदकांसह एकूण २३ पदके जिंकून चीन पहिल्या स्थानावर आहे. जपान २१ पदकांसह (सहा सुवर्णपदकांसह) दुसऱ्या स्थानावर आहे, तर दक्षिण कोरिया १६ पदकांसह (चार सुवर्णपदकांसह) तिसऱ्या स्थानावर आहे.

**रुद्रांक्ष पाटील: भारतीय विश्वविजेता नेमबाज**

रुद्रांक्ष बाळासाहेब पाटील यांचा जन्म १६ डिसेंबर २००३ रोजी महाराष्ट्रातील ठाणे येथे झाला. ते १० मीटर एअर रायफल नेमबाज आहेत. त्यांनी कैरो येथे झालेल्या २०२२ च्या जागतिक स्पर्धेत वैयक्तिक आणि सांघिक अशा दोन्ही प्रकारांत सुवर्णपदके जिंकली. अभिनव बिंद्रा यांच्यानंतर वैयक्तिक जागतिक विजेतेपद जिंकणारे ते दुसरे भारतीय ठरले. २०२२ मध्ये, १० मीटर एअर रायफल प्रकारात ते जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावरही होते.

# टीईटी पेपरफुटी प्रकरणात पोलिसांची कारवाई

## बीड आणि बिहारमधून २ फरार आरोपी गजाआड; सर्व १८ सूत्रधार अटकेत

मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) प्रश्नपत्रिका फुटीच्या बहुचर्चित प्रकरणात भिवंडी पोलिसांना अभूतपूर्व यश मिळाले आहे. या घोटाळ्यातील दीर्घकाळापासून फरार असलेल्या २ मुख्य संशयितांना पोलिसांनी बीड आणि बिहार येथून मुसक्या आवळल्या आहेत. प्रकाश मिसाळ आणि अशोक साव अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून, या कारवाईमुळे या गुन्ह्याशी संबंधित सर्व १८ मुख्य सूत्रधार आता पोलिसांच्या जाळ्यात अडकले आहेत.

**४ राज्यांमध्ये पसरले होते जाळे** - पोलिसांनी केलेल्या सखोल तपासात हा केवळ स्थानिक गैरप्रकार नसून महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश आणि दिल्ली या ४ राज्यांत पसरलेला एक आंतरराज्यीय रॅकेट असल्याचे निष्पन्न झाले आहे. भिवंडी पोलिसांच्या विशेष पथकाने तंत्रज्ञानाचा वापर करत माग काढला आणि फरार दोघांनाही बेड्या ठोकल्या.

**असा उघडकीस आला होता घोटाळा**- ही संपूर्ण घटना २८ जून रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेच्या अवघ्या १ दिवस आधी उघडकीस आली होती. भिवंडीतील एका व्यक्तीला प्रश्नपत्रिका विकण्याचा प्रयत्न होत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी कोणगाव परिसरात 'डमी ग्राहक' बनवून सापळा रचला आणि संशयितांना रंगेहात पकडले. त्यांच्याकडून जप्त केलेले ४ प्रश्नपत्रिका संच 'महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदे'च्या अधिकाऱ्यांकडून तपासून घेतले असता, ते मूळ प्रश्नपत्रिकेशी तंतोतंत जुळत असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी न्यायालयाने दाखल केलेल्या आरोपपत्रात (चार्जशीट) अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घोटाळ्याचे कनेक्शन उत्तर प्रदेशातील आग्रा येथील एका प्रिंटिंग प्रेसशी जोडलेले होते. प्रेसमधील २ कर्मचाऱ्यांनी अवघ्या ८,००० रुपयांच्या आमिषापोटी प्रश्नपत्रिका चोरली होती. ही प्रश्नपत्रिका अत्यंत हुशारीने त्यांनी आपल्या बुटांच्या इनसोल्स आणि सॉक्समध्ये लपवून कारखान्यातून बाहेर काढली होती.

**मुख्य सूत्रधारासह सर्व १८ आरोपींवर कारवाई** - भिवंडी न्यायालयात सादर करण्यात आलेल्या चार्जशीटमध्ये या घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार बिजेंद्र गुप्ता याच्यासह सर्व १८ आरोपींची नावे समाविष्ट आहेत. बिजेंद्र गुप्ता याच्यावर यापूर्वी ओडिशामध्ये झालेल्या एका पेपरफुटी प्रकरणातही गुन्हे दाखल आहेत. सर्व आरोपींविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हे नोंदवून त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.

# राम मंदिरात ७० नव्हे, १०५ वेळा देणगी चोरी झाली

अयोध्या, दि. २१ (वृत्तसंस्था) - अयोध्या राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरणात मोठा खुलासा झाला आहे. सोमवारी सर्वोच्च न्यायालयाला सांगण्यात आले की, मंदिराच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये देणगी चोरीच्या ७० नव्हे, तर १०५ घटना कैद झाल्या आहेत.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) स्टेटस रिपोर्टच्या आधारे न्यायालयाला तपासाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, एसआयटीचा तपास जवळपास पूर्ण झाला आहे. एसआयटीने सीसीटीव्ही फुटेज, साक्षीदारांचे जबाब आणि इतर पुराव्यांची तपासणी करून आरोपींची ओळख पटवली आहे. देणगी आणि मौल्यवान वस्तूंच्या पावत्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून तयार केल्या जातात आणि वस्तू एसबीआयच्या लॉकरमध्ये ठेवल्या जातात. न्यायालयाने एसआयटीचा स्टेटस रिपोर्ट रेकॉर्डवर घेतला आहे.

**सुप्रीम कोर्टात अहवाल सादर**

यापूर्वी २३ जून रोजी पहिल्या एसआयटीने आपला प्राथमिक तपास अहवाल राज्य सरकारकडे सादर केला होता. अहवालानुसार, २७ एप्रिल ते ५ जूनदरम्यान सीसीटीव्हीमध्ये सुमारे ७० संशयास्पद घटना कैद झाल्या होत्या.

फुटेजमध्ये पोलिसांच्या ताब्यात असलेले ८ आरोपी नोटांची बंडले खिशात आणि बुटांमध्ये लपवताना दिसले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दुसरी एसआयटी स्थापन करण्यात आली असून, ती तपास करत आहे.

**२५ सप्टेंबरपर्यंत आरोपपत्र दाखल होणार** - सॉलिसिटर जनरल यांनी सांगितले की, एसआयटी २५ सप्टेंबरपर्यंत आरोपपत्र दाखल करेल. सर्वोच्च न्यायालयाने दंडाधिकाऱ्यांना कायद्यानुसार आरोपपत्रावर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

याचिकाकर्त्यांनी एसआयटी अहवालाची प्रत मागितली होती, मात्र सर्वोच्च न्यायालयाने ती देण्यास नकार दिला. सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सांगितले की, या प्रकरणाला सत्र न्यायाधीशांच्या अधिकारक्षेत्राबाहेर नेण्याची त्यांची इच्छा नाही. गरज पडल्यास न्यायालय पुढील तपासासंदर्भात आदेश जारी करू शकते.

# सणासुदीआधी (एफडीए)ची मोठी कारवाई; छत्रपती संभाजीनगरात ३,६९१ किलो संशयास्पद मिठाई-खवा जप्त

छत्रपती संभाजीनगर दि. २१ (प्रतिनिधी) - सणासुदीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) शहरात मोठी कारवाई केली. शाहनूरमियाँ दर्गा चौक परिसरातील डी-मार्टजवळ दोन ट्रॅव्हल्स बसची तपासणी करत तब्बल ३,६९१ किलो संशयास्पद मिठाई व खवा सदृश अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला.

अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने केलेल्या कारवाईत नीलकंठ ट्रॅव्हल्समधून २,०७९ किलो, तर वीर ट्रॅव्हल्समधून १,६१२ किलो संशयास्पद अन्नसाठा आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या मालाची एकूण अंदाजे किंमत ५ लाख ९४ हजार ७३६ रुपये असल्याची माहिती आहे. कारवाईदरम्यान संबंधित अन्नपदार्थांचे नमुने पुढील तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. प्रयोगशाळेतील तपासणीचा अहवाल प्राप्त होईपर्यंत उर्वरित अन्नसाठा उणे १० अंश सेल्सिअस तापमानात सीलबंद करून ठेवण्यात आला आहे.



या नमुन्यांच्या तपासणी अहवालानंतर अन्नपदार्थांमध्ये नियमबाह्य अथवा आरोग्यास घातक घटक आढळल्यास संबंधितांवर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

सणासुदीच्या काळात मिठाई आणि दुग्धजन्य पदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे अशा पदार्थांच्या वाहतूक व विक्रीवर अन्न व औषध प्रशासनाकडून विशेष लक्ष ठेवले जात आहे.

# 'भारत' विश्व शांतीचे 'उगमस्थान' व 'आधारस्तंभ'

~~जगात शांतता प्रस्थापित रहावी या उद्देशाने १९८१ पासुन संयुक्त~~ राष्ट्र महासभेने २१ सप्टेंबर विश्व शांती दिवस साजरा करण्याची घोषणा केली.तेव्हा पासून जगात विश्व शांती दिवस साजरा करण्यात येतो. जगात भारताला शांतीचे 'प्रतीक' मानल्या जाते. विश्वशांतीची सुरूवात भारतानेच केली आणि पुढेही 'विश्व शांतीची जोत' भारताकडून अशीच 'प्रज्वलित' होत राहील हे आपल्याला जी-२० शिखर परिषदेवरून लक्षात येते. आज जगात शांती कशी प्रस्थापीत करता येईल याकडे भारताचे संपूर्ण लक्ष आहे. भारत हा देवी-देवता, ऋषि-मुनी, साधु-संत, ज्ञानी, थोर महात्म्ये, क्रांतिकारक, जहालवादी-मवाळवादी अशा अनेक विचारवंतांच्या प्रयत्नाने बनलेला जगाच्या पाठीवरील एकमेव देश भारत आहे.त्यामुळे जगात शांतता कशी प्रस्थापीत करता येईल याचा अभ्यास करण्याकरिता संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे नेहमीच असते. कारण जगाच्या पाठीवर भारताचा उगम शांतता प्रस्थापित करण्यासाठीच झाला असावा.त्यामुळे गंगा, कावेरी, गोदावरी, नर्मदा, यमुना, वैनगंगा, तापी, कृष्णा इत्यादी नद्या सुध्दा शांतीचे द्योतक मानले जाते.भारताने नेहमी शांततेचा पुरस्कार केला आहे आणि करीत राहिल.'गौतम बुध्दासारख्या महाज्ञानी' यांनी भारतात शांतीची जोत प्रज्वलीत केली व संपूर्ण जगभर फीरवीली.'मर्यादा पुरूषोत्तम राम' यांनी सुध्दा शांततेचा पाठ संपूर्ण जगाला शिकवणीला व इस्लामिक धर्मगुरू 'महम्मद पैगंबर' यांनी सुध्दा विर्श्व शांती करीता मोठे अभियान छेडले होते त्याचप्रमाणे 'शिख गुरू गुरूनानक देवजी' यांनीही शांती प्रस्थापित करण्यासाठी मोलाची कामगिरी केली. पुर्वी आणि आताही विश्वात शांती प्रस्थापित करण्यासाठी भारत अग्रेसर होता आणि आहे. यात तिळमात्र शंका नाही.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले असुन जगातील अनेक देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.यामुळे जगात 'तिसऱ्या महायुद्धाची आहाट'निर्माण केली आहे. जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी भारत संपूर्ण ताकद लावीत आहे तर चीन नेहमीच शांती भंग करण्याच्या तयारीत असतो.परंतु भारताचे काम शांततेने होत नसेल तर भारतही 'उग्ररूप' धारण करून चीनला पटकनी देवू शकते. मानवाचा जन्म शांतता प्रस्थापित करण्यासाठी व जिवसृष्टीचे संरक्षण करण्यासाठी झाला आहे. परंतु चीन कुत्रे, मांजर, चामगाधड, पाल, साप जे भेटेल ते खातात त्यामुळे आज चीनची बुध्दी कुत्र्यासारखी झाली आहे. त्यामुळे चीनने जर शांती भंग केली तर 'कुत्ते की मौत मारा जायेगा' ही बाब चीनने लक्षात ठेवली पाहिजे.कारण वेळ पडल्यास तैवान चीनला सूध्दा भारी पडु शकतो. जगात आतंकवाद दिवसेंदिवस वाढत होता यामुळे जगातील संपूर्ण देशात भीतीचे वातावरण निर्माण होवून शांती भंग होत होती.शेवटी संपूर्ण जगाला शपथ घ्यावी लागली की जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी आतंकवाद्यांचा खात्मा होणे गरजेचे आहे.त्या पध्दतीने प्रत्येक देशांनी आतंकवाद्यांविरूध्द कारवाईला सुरुवात केली.कारण प्रत्येक देश आतंकवाद्यांच्या कारवाईने त्रस्त होते आणि आहे.परंतु संपूर्ण विर्श्वाला वाटायला लागले की आतंकवाद्यांचा नायनाट केल्याशिवाय जगात शांतता प्रस्थापित होवुच शकत नाही.त्या अनुषंगाने आज प्रत्येक देश शांततेसाठी आतंकवाद्यांचा खात्मा करण्यास दृढ 'संकल्प' असल्याचे दिसून येते. सध्याच्या परीस्थितीत चिनच्या विस्तारवादी नितीमुळे विर्श्व शांती भंग होण्याच्या मार्गावर आहे.

चीन-तैवान संघर्ष लक्षात घेता चायना सी मध्ये चीनला टक्कर देण्यासाठी अमेरिकेसह नाटो सेना सज्ज झाली आहे त्याचबरोबर जापान व ऑस्ट्रेलियाने सूध्दा कंबर कसली आहे. म्हणजेच सध्याच्या परिस्थितीत जगातील शांती भंग करण्याचे काम चीन करीत आहे.याचे प्रायचीत्य संपूर्ण जगाला भोगावे लागु शकते.जगात शांती प्रस्थापित व्हायची असेल तर चीनला त्याची जागा दाखववीच लागेल.चीनच्या विस्तारवादी धोरणामुळे संपूर्ण जगात 'अशांतीचे वातावरण'निर्माण झाले आहे. जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की ज्या ठिकाणी अनेक धर्माचे, जातीचे, पंथाचे व अनेक भाषा बोलणारे लोक रहातात. भारताने नेहमीच शांतीचा पुरस्कार केला आहे.परंतु भारताशेजारी गद्दारांची फौज उभी ठाकली आहे. एकीकडे पाकिस्तानचा आतंकवाद, बांग्लादेशचा जातीयवाद, म्यानमारची घुसखोरी, नेपाळमध्ये गृहयुद्ध व चीनची विस्तारवादी नीती यामुळे भारताने सुध्दा जशास तसे उत्तर देण्याचे ठाणले आहे.भारत नेहमी शेजारी राष्ट्रांसोबत शांती प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात असतो.परंतु भारताचा जीवलग मित्र समजल्या जाणाऱ्या नेपाळनेसुध्दा चीनचे पाय चाटण्याचे काम करीत असतो व भारताच्या पाठीत खंजर खुपसण्याचे काम करतो हे आपण मागे पहाले.अशाप्रकारे भारता शेजारचे संपूर्ण राष्ट्रांना चीन आर्थिक मदत करून आपला कब्जा करून सैन्य सामुग्री व एअरबेस तयार करण्याच्या तयारीत आहे.आज विर्श्व शांति टिकवून ठेवण्यासाठी अती लोकसंख्या असलेल्या देशांनी लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.जगाच्या पाठीवर लोकसंख्येच्या बाबतीत चीन नंतर भारताचा नंबर लागतो. परंतु भारताच्या भुभागाचा विचार केला तर जगात लोकसंख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर असल्याचे दिसून येते. त्यामुळे भारताला शांती प्रस्थापित करण्याकरिता एक पाऊल पुढे टाकून 'हम दो हमारा एक' ही मोहीम राबवुन लोकसंख्या नियंत्रणात आणाली पाहिजे.

युध्द सामुग्रीच्या चढाओढीमुळे प्रत्येक देश अनेक द्वीधेमध्ये असल्याचे दिसून येते.या द्वीधेपासुन मुक्ती मिळवायची असेल तर प्रत्येक देशांनी अणुचाचण्या, घातक हतीयार, मिसाईल परीक्षण, अणुबॉब इत्यादींवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे.तेव्हाच विर्श्वात शांती प्रस्थापित होवु शकते.आज संपूर्ण जगाला ग्यात आहे की विश्वामध्ये शांति प्रस्थापित करायची असेल तर भारताचा सहयोग अती आवश्यक आहे.आज युक्रेन-रशिया व हमास-इजरायल संघर्ष,इरिण-इझरायल संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी भारत शांतता प्रस्थापित करण्यासाठी अग्रेसर आहे. विश्वशांतीच्या बाबतीत भारत काय आहे हे विश्वाला 'महात्मा गांधींनी' दाखवून दिले आणि आज १४० कोटी भारतीयांच्या छत्रछायेच्या माध्यमातून भारत विश्व शांतीचा मसिहा बनल्याचे दिसून येते.कारण प्रत्येक देशाला शांतीची गरज आहे. जगाच्या पाठीवर भारताने अनेक उतार-चढाव पाहीले आहेत. यातुनच शांतीचा उगम झाल्याचे दिसून येते. भारताची संस्कृतीच शांतता प्रस्थापित करण्यासाठी झाली आहे. त्रेतायुग, व्दापरयुग, सत्ययुग आणि कलयुगात सुध्दा भारतीय संस्कृतीने संपूर्ण जगाला शांततेची शिकवण दिली आहे.

भारत भुमित महाभारत, रामायण इत्यादी ज्या घटना घडल्या त्या सर्व विर्श्व शांती करीता होत्या ही बाब संपूर्ण जगाने लक्षात ठेवली पाहिजे.भारतातुन जगात जो ही संदेश जातो तो विर्श्व शांती करीता असतो. भारताने पाकिस्तानला शांततेसाठी हजारो वेळा समजविले. परंतु त्यांच्या नसानसात व रक्तात क्रुरता स्पष्ट दीसुन आली. त्यामुळेच पाकिस्तानात आतंवाद उफाळलेला आहे व तो स्वतः रक्ताच्या लाथोळ्यात अडकल्याचे दिसून येते. त्यामुळेच पाकिस्तानपासून इस्लामीक देशांसह इतर देश अलग-थलग पडल्याचे दिसून येते.विश्व शांती म्हणजे मानसिक सुख नसुन वन्यप्राणी, जीव-जंतु,जंगल संपदा, निसर्गाचे संतुलन, पृथ्वीचे संरक्षण या संपूर्ण बाबींवर योग्य नियंत्रण ठेवुन त्यांची जोपासना केली तर विश्वामध्ये आपोआप शांती नांदायला सुरूवात होईल. 'विश्वाहेची माझे घर'ही भुमिका जगातील प्रत्येक देशांनी व व्यक्तीने जोपासली पाहिजे.आज संपूर्ण जग प्रदुषणामुळे, अनेक आजारामुळे,युध्दजन्य परीस्थितीमुळे जगातील प्रत्येक व्यक्ती त्रस्त आहे.याला कुठेतरी रोखण्याची गरज आहे. विश्वामध्ये शांती प्रस्थापित करण्यामागे भारताचा 'सर्वधर्मसमभाव' हा मुलमंत्र सार्थक ठरत आहे. कारण भारतात हिंदू, मुस्लिम, शिख, ईसाई, बौद्ध, फारसी,ख्रिश्चन इत्यादी अनेक धर्माचा व देवी-देवतांचा वास नेहमी नांदत असतो. त्यामुळे विर्श्व शांतीच्या गंगेचा उगम भारतातून झाल्याचे दिसून येते.या लेखाच्या माध्यमातून मी हेच सांगु इच्छितो की २१ सप्टेंबरला जगातील प्रत्येक व्यक्तीने शांतता प्रस्थापिकरण्यासाठी 'संकल्प' करावा.जगातील देशांना मी आग्रह करेल की 'विस्तारवादी'नीतीचा खात्मा करून जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. कारण विस्तारवादी नीती संपूर्ण जगाला 'घातक' आहे. जगात भारताला विश्वशांतीचे उगमस्थान, दुत, आधारस्तंभ अशा अनेक उपमा दिल्या आहेत. याची जानीव चीनने सुध्दा ठेवली पाहिजे. करोना काळापासून संपूर्ण जग 'नमस्कार' करायला लागले आहे हे सुद्धा भारतीय संस्कृतीचे शांतीचे 'प्रतीक' आहे.

# आले बाप्पा ; मारू गप्पा, आठवणीच्या कोपऱ्यात थोडंसं डोकवा...

'आले बाप्पा' हे दोन शब्द कानावर पडले, की मन अचानक वर्तमानातून भूतकाळात जाऊन पोहोचते. डोळ्यासमोर येतो तो मातीचा सुगंध, कागदी फुलांची सजावट, रंगीत पताका, बांबूचा मंडप, लाऊड स्पीकरवर घुमणारी गाणी. आरतीच्या वेळी जमलेली गर्दी आणि त्या गर्दीत उत्साहाने धावणारे आपली बालपणीची पावले... गणेशोत्सव म्हणजे फक्त गणेश गणपतीची मूर्ती आरती आणि प्रसाद नव्हता. तो आमच्या बालपणाचा एक सुंदर अध्याय होता. तो उत्साह होता. ती मैत्री होती. ती धावपळ होती. ते एकत्र येणे होते आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे माणसं जोडण्याचा एक सुंदर उत्साह होता. आज गणेशोत्सव आला, की आधुनिक सजावट, मोठे मोठे मंडप, आकर्षक सजावट, आधुनिक रोषणाई आणि सोशल मीडियावरील पोस्ट दिसतात. पण मन मात्र त्या जुन्या आठवणींच्या कोपऱ्यात जाऊन बसते आणि मग वाटतं... चला आज जरा जुन्या आठवणींच्या कोपऱ्यात डोकावूया...

**तो बालपणीचा गणेशोत्सव म्हणजे छोटी दुनिया**

लहानपणी गणपती येणार म्हटलं, की घरातच नाही तर संपूर्ण गल्लीत उत्साहाचे वातावरण असायचे. गणपतीच्या काही दिवस आधीपासूनच चर्चा सुरू व्हायची, यंदा मंडप कुठे करायचा? हा रास कशी करायची? गणपतीची मूर्ती कोणा आणणार? वर्गणी कोण गोळा करणार ?यंदा कोणता कार्यक्रम ठेवायचा? या चर्चामध्ये मोठ्यांपेक्षा आपला उत्साह कमी नसायचा. गणपती येण्याच्या आदल्या दिवशी तर झोपच यायची नाही. मंडप उभारण्यासाठी कोणी बांबू आणायचा. कोणी दोर आणायचा. कुणी रंगीत कागद आणायचा. कुणी फुलांच्या माळा बनवायच्या. तर कोणी कागदाच्या पताका तयार करायच्या. साधना साधी होती, पण कल्पनाशक्ती अचाट होती. आजच्या महागड्या सजावटीच्या दुनियेत त्यावेळची आरास कदाचित साधी होती, पण तिला आपल्या हाताचा स्पर्श असायचा. मित्रांची मेहनत होती आणि मनापासून केलेला आनंद होता.

गावात किंवा गल्लीत एखादा बाल तरुण मंडळ असायचं. त्या मंडळाचा सभासद होणं म्हणजे आमच्यासाठी मोठी गोष्ट असायची. कुणाकडे मंडळाची वही असायची, कुणाकडे वर्गणीची पावती पुस्तक, कोणी मांडवाची जबाबदारी घ्यायचा, कोणी कार्यक्रमाची. मुले वयाने लहान असली तरी जबाबदारी मोठी वाटायची. तु पाणी आण, तू फुल घेऊन ये, तू माईकची व्यवस्था बघ, तू आरतीची तयारी कर अशा छोट्या छोट्या जबाबदाऱ्या मिळायच्या. आज विचार केला तर जाणवतं त्या गणेशोत्सवांनीच संघटन, सहकार्य नियोजन आणि जबाबदारी यांचे धडे दिले होते. शाळेत दिले जाणारे धडे त्या मंडळाच्या माध्यमातून प्रत्यक्ष जीवनात अनुभवायला मिळाले.

**तरुणाईचा तो बेधुंद आनंद**

गणेशोत्सव म्हणजे त्या काळाच्या तरुणांसाठी जणू आनंदाची पर्वणीच असायची. दिवसभर काम, शेती व्यवसाय किंवा शिक्षण आणि संध्याकाळी झाली की मंडपात जमायचं. कुणी ढोल वाजवायचा, कोणी लेझीमचा सराव करायचा, कुणी नाटकाची तयारी करायचा, कुणी गाण्याचा कार्यक्रम करायचा, कोणी वक्तृत्व स्पर्धेत भाग घ्यायचा, कुणी भजन; भारुड किंवा सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी करायचा. रात्री उशीर पर्यंत मंडपात गप्पा रंगाच्या. कधी एखाद्या मित्राची मस्करी व्हायची. कधी एखाद्या कार्यक्रमाच्या तालमीवरून वाद व्हायचा. पण दुसऱ्या दिवशी पुन्हा सगळे एकत्र. त्या वयात मनात फार काळ राग टिकत नसे. गणपतीच्या मंडपात मैत्रीचे धागे घट्ट व्हायचे.

**वर्गणी म्हणजे केवळ पैसे नव्हते...**

आजच्या काळात वर्गणीचा विषय आला की अनेक वेगळे प्रश्न निर्माण होतात. पण त्या काळात छोट्या मंडळात वर्गणी म्हणजे आमच्यासाठी एक आनंदाची गोष्ट होती. पाच रुपये, दहा रुपये, वीस रुपये... ज्याच्याकडून जितकी शक्य असेल तितकी वर्गणी. कधी एखाद्या घरातून पैसे मिळाले नाही, तर त्या घरातील काकू म्हणायच्या, 'पोरांनो पैसे नाहीत रे, पण उद्या प्रसादासाठी गुड खोबरे घेऊन जा'. कुणी फुल द्यायची, कुणी नारळ द्यायचं, कोणी प्रसादासाठी धान्य द्यायचं, कोणी मंडपाचं साहित्य द्यायचं.म्हणजे गणेशोत्सव हा संपूर्ण गल्लीचा, गावाचा उत्सव असायचा.

*गणेशोत्सव म्हणजे सांस्कृतिक विद्यापीठ आणि सामाजिक कार्य ही*

त्या काळात मनोरंजनाची साधना मर्यादित होती. मोबाईल नव्हते. सोशल मीडिया नव्हता आणि प्रत्येकाच्या हातात इंटरनेट नव्हतं. म्हणून गणेश उत्सवातील संस्कृतीक कार्यक्रमाची सगळी आतुरतेने वाट पाहायचे.नाटक असो, गाणे असो, वकृत्व स्पर्धा असो किंवा विनोदी कार्यक्रम... मुलांना आपली कला दाखवण्याची संधी मिळायची. आयुष्यात पहिल्यांदा स्टेजवर उभे राहण्याची संधी गणपती मुळे मिळायची. कुणाचा आत्मविश्वास वाढायचा, कुणाला भाषणाची आवड लागायची, कुणाला अभिनयाची, कुणाला संगीताची. कुणी पुढे जाऊन कलाकार झाला. कोणी शिक्षक झाला. सामाजिक कार्यकर्ता झाला, पण त्यात प्रवासाची पहिली पायरी गणेशोत्सवाच्या कार्यक्रमातच चढली गेली होती.

गणेशोत्सव म्हणजे केवळ मनोरंजन नव्हतं. तरुण मंडळे सामाजिक उपक्रमही राबवायची. गावात स्वच्छता मोहीम राबवायचे, रस्ते स्वच्छ करायचे, पाण्याची व्यवस्था करायची, गरजू कुटुंबाला मदत करायची, रक्तदान शिबिरे; आरोग्य तपासणी, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती जनजागृती अशा उपक्रमास सुरुवात करायची. कुठे एखाद्या गरीब विद्यार्थ्याला शैक्षणिक साहित्य दिलं जायचं. कुणाच्या अडचणीच्या काळात मंडळातील तरुण धावून जायचे. त्यावेळी प्रसिद्धीची एवढी हाव नव्हती. आजच्या भाषेत सांगायचं, तर प्रत्येक कामाचं छायाचित्र काढून सोशल मीडियावर टाकण्याची गरज वाटत नव्हती. काम झालं, माणसाला मदत झाली आणि मनाला समाधान मिळालं एवढंच पुरेसं होतं.

आरती आणि गणेश विसर्जन डोळ्यात पाणी...

संध्याकाळची वेळ झाली, की गणपतीच्या मंडपात गर्दी वाढवायची. आरती सुरू झाली, की लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळे एकत्र उभे राहायचे. कुणाच्या टाळ, कुणाच्या हातात घंटा. आरती संपली की प्रसादासाठी मुलांची लगबग असायची. प्रसाद छोटासा असायचा, पण त्याची चव मात्र आजही जिभेवर रेंगाळते. कारण त्या प्रसादात फक्त साखर, खोबरं किंवा शेंगदाणे नव्हते त्यात बालपण मिसळलेलं होतं.

गणेशोत्सवाचे दिवस कसे संपायचे हे कळायचं नाही. विसर्जनाचा दिवस आला, की मनावर एक वेगळीच उदासी असायची. ज्याच्यासाठी एवढी धावपळ केली, ज्याच्या सोबत एवढे दिवस आनंद केला त्या बाप्पाला निरोप द्यायचा म्हणजे मन भरून यायचं. मिरवणुकीत उत्साह असायचा, पण डोळ्याच्या कडा ओलावलेल्या असायच्या. पुढच्या वर्षी लवकर या, हा जयघोष करताना मनात एकच भावना असायची, बाप्पा पुन्हा लवकर यावे आणि पुन्हा असाच आनंद मिळावा. आज ही विसर्जनाच्या मिरवणुकीत 'गणपती बाप्पा मोरया' ऐकताना बालपणीचा तो चेहरा मनात कुठे तरी उभा राहतो.

*चला आठवणीच्या कोपऱ्यात जरा डोकावूया...*

आता गणपती बाप्पा आले आहेत. चला या निमित्ताने थोडं वर्तमान विसरू या, मोबाईल बाजूला ठेवूया, जुन्या मित्राला फोन करूया. 'काय रे आठवतंय का आपलं गणपती मंडळ, आठवते का तो जुना मंडप, ते आरास, ते नाटक ती वर्गणीची वही, तो प्रसाद आणि बाप्पाच्या विसर्जनाचा तो दिवस', कदाचित समोरचा मित्रही क्षणभर शांत होईल आणि दोघेही असतील, कारण काही आठवणींना काळाची मर्यादा नसते.

गणपती बाप्पा दरवर्षी येतात. आपण त्यांच्यासाठी घर सजवतो, मंडप सजवतो , आरास करतो, पण यंदा आपल्या एकदा आपल्या आठवणीच घर सजवूया. बालपणीच्या आठवणींची धूळ झटकू या, जुन्या मित्रांना आठवू या, त्या बाल तरुण मंडळाच्या दिवसांना आठवू या. त्या निरागस उत्साहाला आठवूया आणि त्या काळातील सामाजिक बांधिलकी, मैत्री, सहकार्य आणि माणुसकी पुन्हा आपल्या आयुष्यात आणण्याचा प्रयत्न करूया. कारण बाप्पा म्हणजे, फक्त उत्सव नाही. बाप्पा म्हणजे माणसं एकत्र आणणारा धागा आहेत. बाप्पा म्हणजे आठवणीच्या कप्प्यात लपलेलं बालपण आहे. बाप्पां मैत्रीचा उत्सव आहे. बाप्पा म्हणजे तरुणांचा उत्साह आहे. बाप्पा म्हणजे समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा आहे. म्हणूनच आले बाप्पा, मारू गप्पा ,आठवणीच्या कोपऱ्यात जरा डोकवा... जुन्या मित्रांना पुन्हा हाक मारा, बालपणाला पुन्हा एकदा भेटून या आणि बाप्पाच्या साक्षीने माणुसकीचा उत्सव पुन्हा जगूया... गणपती बाप्पा मोरया...

**श्री. प्रशांत वाघमारे पंढरपूर**
**९८६०७८६७३५.**

# मनपाच्या खुले प्लॉट आणि बांधकाम गुंठेवारीसाठी जनहितार्थ किमान सहा महीने मुदतवाद द्या -राजेंद्र दाते पाटील

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) -महानगर पालिका छत्रपती संभाजीनगर गुंठेवारी योजनेत खुले प्लॉट व बांधकाम अधिकृत करण्या साठी दुष्काळ सदृश स्थितीपाहता सहा महिने जुन्या निर्णया प्रमाणे मुदत वाढ देण्याचे आदेश तात्काळ करा अशी मागणी जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री महाराष्ट्र शासन यांचे कडे जनहितार्थ केली आहे.

त्यांनी असे नमुद केले आहे की, महानगर महापालीका छत्रपती संभाजीनगर येथे गुंठेवारी योजने अंतर्गत घरे व खुले प्लॉट सवलतीच्या योजनेत नियमानुकूल करून घेण्याची मोहीम सुस्थितीत सुरु आहे. दुष्काळ सदृश स्थितीमुळे नागरिक हतबल झालेले असल्यामुळे सप्टेंबर महिन्या पर्यंत मुदत दिली होती ही मुदत वाढ किमान सहा महिने होणेअत्यावश्यक आहे. अचानकपणे मनपा आयुक्त यांनी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंतच प्लॉट,घराच्या गुंठेवारीसाठी अखेरची मुदत देण्याचा निर्णय केला असून हा अत्यंत अन्याय कारक ठरणार असून यात भरीसभर म्हणून १ नोव्हेंबर २०२६ पासून अनधिकृत घरे पाडण्याची मोहीम सुरू करण्याची घोषणा ही तर गोरगरीब जनतेने प्रचंड मेहनतीने प्राप्त केलेली सदरची मालमत्ता पडण्याचा निर्णय निवारा यासंकल्पनेवर घाला घालण्याचा अन्याय कारक निर्णय आहे.पुढे ते म्हणतात की, गुंठेवारी योजनेत खुले प्लॉट अधिकृत करण्यासाठी महापालिकेने १५ सप्टेंबर पर्यंत मुदत दिली होती. ही मुदत वाढविण्याचा निर्णय आयुक्त अमोल येडगे यांनी गुरुवारी घेतला तो फक्त ३१ऑक्टोबर २०२६ पर्यंतच असुन नागरिकांना खुले प्लॉट आणि घरांची गुंठेवारी चार्जेसमध्ये ५० टक्के सूट देण्यात आली आहे.घरांसाठी बेटरमेंट चार्ज १०० टक्के ड्रोनद्वारे सर्वेक्षण करणार माफ केला आहे. सोबतच अन्सलरी आणि साइड मार्जिन वरील प्रत्येकी दहा टक्के लावण्यात येणारा दंड ही माफ केला आहे. गुंठेवारीत पूर्वी आकारण्यात येणारा ६० टक्के दंड आता माफ झाला आहे. त्यामुळे नागरिकांकडून सध्या चांगला प्रतिसादमिळत असुन ०१एप्रिल ते १५ सप्टेंबर पर्यंत गुंठेवारी योजनेतून ५७ कोटी २९ लाख रुपये मनपास प्राप्त झाले असुन आता गुंठेवारी योजनाच पूर्ण पणे बंद करण्याचा आयुक्ताचा मानस जनविरोधी असुन अगदी मंगळवारी या शेवटच्या दिवशी १२ते १५ कोटी रुपये नागरिकांच्या वतीने भरले जातील अशी अपेक्षा असुन ही बाब मनपाच्या उत्पन्नास भर घालणारे असुन सहा महिने मुदत वाढ म्हणजे मनपाच्या उत्पन्ननात भर घालणारा शासनाचा सकारात्मक निर्णय ठरेल असेही जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्र छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी केले असून याच मुळे त्यांनी नगरविकास मंत्र्यांना विनंती केली आहे की, महानगर पालिका छत्रपती संभाजीनगर गुंठेवारी योजनेत खुले प्लॉट व बांधकाम अधिकृत करण्या साठी दुष्काळ सदृश स्थिती पाहता सहा महिने जुन्या दर व निर्णया प्रमाणे मुदत वाढ देण्याचे आदेश तात्काळ जनहितार्थ व्हावेत ही नम्र विनंती त्यांनी केली असुन सदरचे निवेदन तात्काळ नगरविकास मंत्र्यांना पाठविण्यात येणार असल्याची माहिती जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्र छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी दिली आहे.

# लोकसंवाद'मधून छावणी येथील गणेशभक्तांच्या दारी डाक विभागाच्या योजना




छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) - गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि सेवांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'लोकसंवाद-२०२६' अंतर्गत भारतीय डाक विभाग व जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने छावणी येथील छावणी गणेश मंडळात 'नाईट कॅम्प' आयोजित करण्यात आला. यावेळी गणेशभक्तांना डाक विभागाच्या विविध बचत, विमा व गुंतवणूक योजनांची माहिती देण्यात आली.

राज्य शासनामार्फत दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने दि. १६ ते २४ सप्टेंबर या कालावधीत राज्यभर 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. गणेश मंडळांच्या माध्यमातून नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून शासकीय योजना व सेवांची माहिती पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

छावणी गणेश मंडळात आयोजित कॅम्पमध्ये पोस्ट ऑफिस बचत खाते (POS>B), आवर्ती ठेव (R>D), मुदत ठेव (T>D), सुकन्या समृद्धी योजना (SSY), पोस्टल लाइफ इन्शुरन्स (PL>I) आणि ग्रामीण पोस्टल लाइफ इन्शुरन्स (RPLI) आदी योजनांची माहिती देण्यात आली. तसेच पात्र नागरिकांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी जवळच्या पोस्ट ऑफिसशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी डाक विभागाचे अधिकारी, पोस्टमन कर्मचारी, छावणी गणेश मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच गणेशभक्त उपस्थित होते.

'लोकसंवाद-२०२६'च्या माध्यमातून कृषी, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, सार्वजनिक आरोग्य, कौशल्य विकास, क्रीडा व युवक कल्याण यांसह विविध विभागांच्या लोककल्याणकारी योजना व सेवांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे.

# कुबेर प्रतिष्ठान गणेश मंडळ, अभिनव उपक्रम; महिला बचत गट; महिला सक्षमीकरण व स्वावलंबनाचे प्रभावी माध्यम

वैजापूर, दि. २१ (प्रतिनिधी) - महिला जन्मतःच काटक, संयमी व समंजस असतात, महिलांच्या ठायी कर्तृत्वसंपन्नता असते, महिला उद्यमी व कार्य कुशल असतात, महिलांचे बचत गटाच्या माध्यमातून स्वावलंबन व सक्षमीकरण होणे सहज शक्य असते. त्यांना पुरुष वर्गाने संधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी तथा जेष्ठतम सामाजिक कार्यकर्ते धोंडीराम सिंह राजपूत यांनी येथील कुबेर प्रतिष्ठाण गणेश मंडळाने शहरातील कर्तृत्व सम्पन्न महिलांच्या गौरव प्रित्यर्थ आयोजित कार्यक्रमात महिला बचत गट,व महिला सक्षमीकरण विषयावर मार्गदर्शन करतांना रविवार(ता,२०) रोजी,हरिदास गल्लीत आयोजित




कार्यक्रमात केले.

आरंभी मंडळाच्या वतीने गणेशोत्सव निमित्त 'श्री.गणपती अथर्वशीर्ष'पठण ही महिला वर्गाने केले. मंडळाचे अध्यक्ष गौरव दौडे यांनी प्रास्ताविकात महिला बचत गट, महिला सक्षमीकरण, एकल महिला, मुलगा मुलगी समान या बाबत माहिती दिली.

कुबेर प्रतिष्ठाण गणेश मंडळाने विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाज प्रबोधन कार्यक्रम आयोजित केलेले आहेत. या प्रसंगी मंडळाचे मधुकर कुहिले,गणेश पहाडी, आकाश चापानेरकर, कृष्णा जेजुरकर, सचिन गिरे, महेश पहाडी, स्वप्नील राजपूत, अमोल तास्कर, कोमल वर्मा, विशाल दाभाडे, आकाश हिवाळे या साठी परिश्रम घेत आहेत. जेजुरीच्या खंडेरायाचा देखावा पाहण्यासाठी शहर व परिसरातील गणेश भक्त मोठया संख्येने येत आहेत.

# श्री. मारोती मंदिर पाटील गल्ली वैजापूर नवीन कार्यकारिणीची एकमताने निवड



वैजापूर, दि. २१ (प्रतिनिधी) - पाटील गल्ली येथील श्री मारोती मंदिर शहराच्या प्रवेश द्वारा समोर नोंदणी कृत अति प्राचीन मंदिर असून या मंदिराचे अध्यक्ष उत्तम राव साळुंके यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदांवर नियुक्ती करण्यासाठी मंदिराच्या विश्वस्त यांची नुकतीच बैठक सम्पन्न होऊन नवीन विश्वस्त खालील प्रमाणे एकमताने निवडण्यात आले,अध्यक्ष -राजेंद्र जगन्नाथ पा, साळुंके, सचिव-सोन्याबापू एकनाथ गावडे विश्वस्त. संचालक श्रीनिवास साळुंके, घनश्याम वाणी, अण्णासाहेब शेळके, रंजकराव शेटे, परसराम आलूले, शिवाजी शेटे, लिमेश वाणी, रामकृष्ण पुतळे, पोपट भोसले, सी.के.पवार या संचालक मंडळाने पदभार स्वीकारला आहे.या नवीन कार्यकारिणीचे शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र वसंतराव साळुंके,सचिन वाणी, जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत, सेवानिवृत्त फौजदार सोपानराव निकम,अण्णासाहेव चव्हाण यांनी अभिनंदन केले.

# श्रद्धेय अशोकजी सिंघल जन्मशताब्दीनिमित्त
# राममंदिर योद्धा स्मृती वंदन सभा




छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) - विश्व हिंदू परिषदेचे आद्य राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दीनिमित्त २७ सप्टेंबर २०२६ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. उच्चविद्याविभूषित मा. अशोकजी यांचा जन्म उत्तर प्रदेशातील मेरठ येथे झाला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक 'संघाचे पूर्णवेळ प्रचारक' म्हणून कार्य स्वीकारले. हिंदू समाजासाठी सेवाकार्याचे संस्कार रुजविण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. आध्यात्मिक क्षेत्रातही अशोकजींचे योगदान मोठे राहिले.

विश्व हिंदू परिषदेचे कार्य संपूर्ण भारतात विस्तारण्यासाठी तसेच विश्व हिंदू परिषदेला जागतिक स्वरूप देण्यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. समाजाला सोबत घेऊन अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मुक्तीसाठी व्यापक आंदोलन उभे करण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. मा. अशोकजी सिंघल यांनी विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून हिंदू समाजासाठी देशभरात केलेले समर्पित कार्य सर्वश्रुत आहे. अशा आदरणीय अशोकजी सिंघल यांची जन्मशताब्दी साजरी करण्यासाठी संपूर्ण देशभरात दि. २७ सप्टेंबरपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

**छत्रपती संभाजीनगर शहरात अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता, संत एकनाथ रंग मंदिर सभागृह, छत्रपती संभाजीनगर येथे 'राममंदिर योद्धा स्मृती वंदन सभा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी शहरातील प्रतिष्ठित नागरिकांची स्वागत समिती गठित करण्यात आली आहे.**

जन्मशताब्दी वर्षात विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून संघटना व समाजामध्ये कार्य करणाऱ्या सेवकांना सोबत घेऊन वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच हिंदू समाजासाठी विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या सेवाभावी व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमासाठी विविध पंथ व संप्रदायांतील प्रमुख मंडळी उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांचीही उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा. हुकूमचंदाजी सवला, अखिल भारतीय उपाध्यक्ष, विश्व हिंदू परिषद तसेच परम पूज्य भास्कर गिरी महाराज आणि इतर मान्यवर असणार आहेत. श्रद्धेय अशोकजी सिंघल यांच्या कार्याचा इतिहास, त्यांचे योगदान आणि त्यांच्या कार्यातून मिळणारी प्रेरणा याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमासाठी हिंदू समाजातील विविध धर्मगुरू, संत-महंत तसेच सर्व हिंदू बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वागत समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# क्रीडा कौशल्यासोबतच भविष्यातील करिअरची तयारी करा - क्रीडा उपसंचालक शेखर पाटील







छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) - खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात प्रगती साधतानाच शिक्षण, कौशल्यविकास आणि भविष्यातील रोजगाराच्या संधींचाही गांभीर्याने विचार करावा. क्रीडा कारकीर्दीसोबतच पर्यायी करिअरची तयारी केल्यास भविष्यात विविध क्षेत्रांतील संधींचा लाभ घेता येईल, असे प्रतिपादन क्रीडा उपसंचालक शेखर पाटील यांनी केले.

विभागीय क्रीडा संकुलातील निवासी क्रीडा प्रबोधिनी येथे गणेशोत्सवानिमित्त माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने आयोजित 'लोकसंवाद' कार्यक्रमात ते मार्गदर्शन करत होते. यावेळी माहिती उपसंचालक प्रवीण टाके, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, क्रीडा प्रबोधिनीच्या प्राचार्य श्रीमती पूनम नवगिरे, सहाय्यक संचालक सुरेश पाटील आदी उपस्थित होते.

क्रीडा उपसंचालक पाटील म्हणाले, खेळाडूंनी उपलब्ध प्रशिक्षण व सुविधांचा प्रभावी उपयोग करून आपल्या क्रीडा कौशल्याचा सातत्याने विकास करावा. स्पर्धांमधून मिळणारा अनुभव, शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुणांचा उपयोग भविष्यातील विविध क्षेत्रांतही करता येतो. क्रीडा क्षेत्रातील अनुभवाच्या आधारे प्रशिक्षक, क्रीडा शिक्षक, शरीरविज्ञान व पुनर्वसन यांसारख्या क्षेत्रांतही करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. तसेच खेळाडू आरक्षणाच्या माध्यमातून शासकीय सेवेत उपलब्ध संधींची माहिती घेऊन त्यासाठी आवश्यक पात्रता व तयारी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

लोकसंवाद कार्यक्रमांतर्गत पत्रकारितेतील विविध संधी या विषयावरच्या माहितीचा संदर्भ आपल्या करिअरमध्ये विद्यार्थ्यांनी ठेवावा. तसेच क्रीडा आणि माध्यम क्षेत्रातील शिक्षण आपले व्यक्तिमत्व आणि कौशल्य वाढवू शकते असे त्यांनी स्पष्ट केले.

क्रीडा पत्रकारितेतही करिअरच्या संधी

माहिती उपसंचालक प्रवीण टाके यांनी यावेळी माध्यम क्षेत्रातील संधी याविषयी माहिती दिली. क्रीडा क्षेत्रात प्राथमिक करिअर करताना पत्रकारिता व जनमाध्यमातील वेगवेगळ्या संधीबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. 'क्रीडा पत्रकारिता' या विषयावर मार्गदर्शन केले. क्रीडा क्षेत्रासोबत पत्रकारिता, क्रीडा पत्रकारिता, समालोचन, जनसंपर्क, संहिता लेखन, जाहिरात, डिजिटल माध्यम मोबाईल जर्नालिझम अशा कितीतरी क्षेत्रात एक अतिरिक्त कौशल्य म्हणून प्राविण्य मिळवले जाऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

डॉ. दुसाने म्हणाले, खेळाडूंनी क्रीडेसोबत शिक्षणालाही समान महत्त्व द्यावे. क्रीडा कारकीर्दीला विशिष्ट वयोमर्यादा असल्याने पुढील शैक्षणिक टप्प्यांबाबत योग्य वेळी निर्णय घेणे आवश्यक आहे. अकरावी-बारावीनंतर अभियांत्रिकी, वैद्यकीय, संगणक, कृषी, कला यांसह पत्रकारितेतील विविध संधीची, अभ्यासक्रमांची माहिती घेऊन आपल्या आवडी आणि क्षमतेनुसार करिअरची दिशा निश्चित करावी. छत्रपती संभाजी नगर क्रीडा उपसंचालक कार्यालय, माहिती उपसंचालक व जिल्हा माहिती कार्यालय यांच्यामार्फत या महासंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पान १ वरून...

## मंगलप्रभात लोढांनी...

मूर्तीचा डावा कान बाधित झाल्याचा दावा करण्यात आला असून दिगंबर जैन संस्थानच्या तक्रारीत श्वेतांबर पंथीय भाविकांचा मोठा समूह मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करुन मूर्ती उचलण्याचा तसेच तिची विटंबना करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे दिगंबर समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्याचे निवेदनात म्हटले आहे. दरम्यान,या आरोपांबाबत संबंधित श्वेतांबर पक्षाची अधिकृत बाजू अद्याप समोर आलेली नाही दिगंबर समाजाच्या म्हणण्यानुसार,श्वेतांबर समाजाच्या पर्युषण काळात दिगंबर समाजाने कोणत्याही प्रकारचा त्यांच्या पर्युषण पर्वात अडथळा निर्माण करण्यात आला नव्हता. मात्र,दिगंबर समाजाचे दशलक्षण पर्व सुरू असतानाच हा श्वेतम्बर समाजाने प्रकार घडविल्याने भाविकांमध्ये तीव्र नाराजी असून धार्मिक स्थळांबाबत वाद निर्माण झाल्याचा दावा करण्यात आला. यासंदर्भात चौकशी करून कारवाईची मागणी केली.

# पालकमंत्र्यांनी केली पिकस्थितीची पाहणी



छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) - राज्याचे सामाजिक न्याय तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज वैजापूर तालुक्यात टंचाईग्रस्त भागात पिकस्थितीची पाहणी केली. आ. रमेश बोरनारे हे त्यांच्या समवेत होते.

पालकमंत्रीसंजय शिरसाट यांनी आज मौजे जांबरगाव ता. वैजापूर येथे टंचाईच्या पार्श्वभूमीवर भेट देऊन पीक परिस्थितीची पाहणी केली. त्यांचे समवेत तहसिलदार सुनिल सावंत, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी तसेच स्थानिक अधिकारी आदी उपस्थित होते. यावेळी श्री. शिरसाट यांनी उपस्थित शेतकऱ्यांशीही संवाद साधला. लोकांची मते जाणून घेतली. पिकांची स्थिती पाहून पालकमंत्री शिरसाट यांनी शेतकऱ्यांना धीर दिला. अधिकाऱ्यांनी पंचनामे करावे,असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असून शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये,असे शेतकऱ्यांना आश्वस्त केले.

# वैजापूरात 'श्री गणेशा आरोग्याचा मोहीम-२०२६' अंतर्गत गणेश मंडळ समोर आरोग्य तपासणी



वैजापूर, दि. २१ (प्रतिनिधी) - मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष अंतर्गत राज्यभर गणेश मंडळ समोर सार्वजनिक आरोग्य तपासणी होत आहेत. याचाच भाग म्हणून 'आनंद कॉलेज ऑफ होमिओपॅथी'तर्फे ठक्कर बाजार येथे श्री छत्रपती शासन गणेश मंडळ समोर 'श्री गणेशा आरोग्याचा मोहीम-२०२६' अंतर्गत रुग्ण मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार वाटप शिबीर सोमवार (ता.२१) रोजी जिल्हा आरोग्य समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत, सुनील त्रिभुवन, डॉ. मंदार कापरे, डॉ. स्नेहल दिवे यांच्या उपस्थितीत आरंभ झाले. दुपार २ वाजेपर्यंत जवळपास शंभर रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली व त्यांना मोफत औषधे देण्यात आली.

या प्रसंगी अक्षय कुंदे, ऋषीकेश पैठणकर, प्रथमेश पवार, राहूल बागुल, तेजस टिळेकर, सुमित मोतीचुर, अजय खाजेकर, शुभम जोशी, दीपक पवार, आशुतोष रामैय्या या आरोग्य तपासणी शिबिरात उपस्थिती राहून सहकार्य केले.

न्यू हायस्कुल, फुलवाडी रोड येथील शाळेजवळ ही गणेश मंडळ समोर डॉ.जागृती कासार व डॉ. चिंतामणी सावंत व सहाय्यक यांनी आरोग्य तपासणी केली. आनंद कॉलेज ऑफ फिजिओथेरपी च्या वैद्यकीय विद्यार्थ्यांनी रुग्णांची तपासणी केली.

# उन्नतीच्या 'स्वर निनाद' मैफिलीने जिंकली रसिकांची मने




पुणे दि. २१ (प्रतिनिधी) - राजकीय, सामाजिक बांधिलकी सोबतच प्रभागातील सांस्कृतिक चळवळीला बळकटी देण्यासाठी पिंपळे सौदागर येथील उन्नती सोशल फाऊंडेशनच्या वतीने आयोजित ' स्वर निनाद ' या मैफिलीला परिसरातील रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. रविवार दि. २० रोजी सायंकाळी उन्नतीच्या प्रांगणात झालेल्या या रंगारंग मैफिलीत गीतकार, संगीतकार आणि गायिका म्हणून परिचित असलेल्या भारती न्यायाधीश आणि त्यांच्या शिष्य कलावंतांनी शास्त्रीय, सुगम आणि चित्रपट गीतांच्या सादरीकरणाने उपस्थित रसिकांची मने जिंकली.

विशेष म्हणजे या मैफलीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका विधी समिती सदस्या तथा प्रभागातील नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे यांनी या मैफिलीत ' ओंकार प्रधान रुप गणेशाचे ' ही संत तुकाराम महाराज यांची रचना सादर करुन आपल्या राजकीय व्यक्तीमत्वात दडलेल्या कलाकाराची ओळख अधोरेखित केली. सदरील मैफिलीचा प्रारंभ ' आले रे गणपती आज दारी रे ' या गणेशस्तवनाने करण्यात आला. त्यानंतर हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील यमन, भूप, बिहाग, काफि, भीमपलास या रागातील बंदीशी सादर करण्यात आल्या. अभिजात संगीताच्या या सुरेल स्वराविष्कानंतर काही सुगम आणि चित्रपट गीतांव्दारे उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या मैफलीचा समारोप भारती न्यायाधीश यांनी गायलेल्या ' वंदे मातरमब ' ने करण्यात आला. रसिकांच्या प्रतिसादात रंगलेल्या या मैफलीत इरा, शौर्यवी, राघवी, ध्वनी, अथर्व, आस्मी, ओजस्वी, पयोधी, सौम्या , गार्गी, श्रीयान हे बालकलावंत आणि सुलभा माने, प्रभा बसवंते, रेखा देवपूरकर, सुचिता सिदनाळे, सुनीता सावळे या ज्येष्ठ महिला शिष्य कलावंतांनी वैविध्यपूर्ण गाणी सादर केली. सर्व कलावंतांना तबल्यावर चैतन्य डांगे तर संवादीनीवर भारती न्यायाधीश यांनी समर्पक साथसंगत केली.

मैफिलीच्या निवेदनाची बाजू भामिनी महाले यांनी समर्थपणे सांभाळली. उन्नती सोशल फाऊंडेशनचे संस्थापक संजय भिसे, नगरसेविका डॉ. कुंदाताई भिसे तसेच पिंपरी चिंचवड कल्चरल फाऊंडेशनचे अध्यक्ष विजय भिसे, उद्योजक धनंजय भिसे यांच्याहस्ते कलावंतांचा सत्कार करण्यात आला.

# श्रावक संघ सिडकोतर्फे सामूहिक क्षमायाचना कार्यक्रम संपन्न





छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) - गुरु गौतम श्री श्वेतांबर वर्धमान जैन सेवा संघ, सिडको यांच्या वतीने श्री शंखेश्वर पार्श्वनाथ जैन जिनालय येथे पर्युषण महापर्वाच्या सांगता निमित्त सामूहिक क्षमायाचना व महाप्रसादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास सकल जैन समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री शंखेश्वर पार्श्वनाथ जैन जिनालय येथे दि. ८ सप्टेंबरपासून पर्युषण महापर्वास प्रारंभ झाला होता. रविवारी (दि. २०) महापर्वाच्या सांगतेनिमित्त सकाळी १० वाजता सामूहिक क्षमायाचना कार्यक्रम पार पडला. परमपूज्य कोटा गुणी श्रीजी, परमपूज्य धैर्यनिधी श्रीजी आणि परमपूज्य पर्वनिधी श्रीजी महाराज साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली क्षमायाचनेचे महत्त्व उपस्थितांना सांगण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नवकार महामंत्राचे पठण व स्वागतगीत सादर करण्यात आले. त्यानंतर गुरु भगवंतांनी क्षमायाचना, आत्म शुद्धी आणि परस्परांतील प्रेमभाव याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी श्रावक संघ सिडकोचे अध्यक्ष डॉ. प्रकाश झांबड यांनी प्रास्ताविक केले. सकल समाजाचे कार्याध्यक्ष आ. सुभाष झांबड यांनी सामूहिक क्षमायाचनेचे महत्त्व विशद करत मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास श्रावक संघ सिडकोचे सुरेश चंडालिया, जी. एम. बोथरा, रतीलाल मुगदिया, डॉ. प्रकाश झांबड, नगीनचंद संघवी, राजेश कांकरिया, मिठालाल कांकरिया यांच्यासह लाभार्थी परिवार उपस्थित होते. तसेच मारवाडी महासभेचे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम दरख, सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्र बाबू दर्डा, गौतम लब्धी अध्यक्ष पंकज फुलपगार, माजी खासदार डॉ. भागवत कराड, हायकोर्टचे न्यायमूर्ती बोरा साहेब यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पर्युषण महापर्वात तपश्चर्या करणाऱ्या तपस्वींचा यावेळी श्रावक संघ सिडकोच्या वतीने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमानंतर आयोजित गौतम प्रसादीचा लाभ श्री सिडको रॉयल जैन ग्रुपच्या वतीने घेण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. आरती झांबड व सौ. मित्तल जैन यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रकाश झांबड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अजीत चंडालिया, राजेश संचेती तसेच श्री सिडको रॉयल जैन ग्रुपच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# दिमाखदार सोहळ्यात 'येवला समाज रत्न' पुरस्कारांचे शानदार वितरण




वैजापूर/येवला, दि. २१ (प्रतिनिधी) - सात वर्षाचा गौरवशाली प्रवास करणाऱ्या 'साप्ताहिक येवला वृत्त' च्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उत्कृष्ट समाजसेवकांचा रविवार (ता.२०)रोजी दिमाखदार सोहळ्यात दिग्गज मांन्यवरांच्या उपस्थितीत येवल्याच्या २० समाजरत्नांचा लक्ष्मी सिनेप्लेक्स येथे शाल, स्मृती चिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात नगराध्यक्ष राजेंद्र लोणारी,राजपूत फोरमचे प्रांतीय अध्यक्ष राजेन्द्रसिंह राजपूत (चौहान), दराडे फाउंडेशनचे कुणाल दराडे, डॉ. संकेत शिंदे, विकर्णसिंह (बाळू शेठ परदेशी) परदेशी, सर्जेराव सावंत व माजी शिक्षणाधिकारी तथा जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत, आयोजक संपादक धिरजसिंह परदेशी, उप संपादक नाना लहरे, निवासी संपादक प्रसाद कुलकर्णी यांची उपस्थिती होती. 'येवला साप्ताहिक'चे दैनिकात रूपांतर व्हावे अशा शुभेच्छा राजेंद्रसिंह राजपूत यांनी दिल्या,तर कुणाल दराडे यांनी येवला वृत्त हे शहराचा सामाजिक,ऐतिहासिक वारसा जपुन दायित्व पूर्ण करीत आहे,या वृत्तपत्राच्या पाठीशी मी सदैव उभा आहे. धीरजसिंह परदेशी यांनी आवाज द्यावा मी सदैव सहकार्यचा हात पुढे करेल असे उदगार काढले तर डॉ. संकेत शिंदे यांनी हे वृत्तपत्र सामाजिक समस्या ,नागरिक समस्या यांना वाचा फोडून शहराच्या विकास कामांना गती देण्याचे महत्वपूर्ण कार्य करीत असल्याचे नमूद केले. समाजरत्न पुरस्कार मिळालेल्या सर्व बंधू-भगिनीचे अभिनंदन करीत धोंडीरामसिंह राजपूत म्हणाले की, पुरस्कारार्थी यांची जबाबदारी वाढली असून त्यांनी आणखी जोमाने कार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. आरंभी हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन करून ज्योत प्रज्वलित करण्यात आली. प्रास्तविक या वृत्तपत्राचे संपादक धिरजसिंह परदेशी यांनी केले. अत्यंत बहारदार सूत्रसंचलन श्री. महाले यांनी केले तर मनभावक आभार प्रदर्शन निवासी संपादक प्रसाद कुलकर्णी यांनी केले.जेष्ठतम नागरिक प्रभाकर झळके, प्रजापिता ब्रम्हाकुमारी विश्व विद्यालय केंद्रच्या नीता दीदी, नारायण मामा शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याने नावाजलेल्या व्यक्तींचा गौरव हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होय

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# भरती परीक्षांची विश्वासार्हता वाढविण्यासाठी शिफारशी देणार – व्ही. राधा

## आतापर्यंत पुणे, नागपूर व अमरावती येथे सुमारे १,७५० विद्यार्थ्यांशी संवाद!

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) – राज्यातील शासकीय भरती परीक्षा प्रक्रिया पारदर्शक, गुणवत्तापूर्ण, विश्वासार्ह आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी शासनाला समिती शिफारशी सादर करेल. परीक्षा वेळापत्रक, प्रश्नपत्रिकेचा दर्जा, परीक्षा केंद्रे, पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण, पेपर तपासणी, सामान्यीकरण, निकाल, न्यायालयीन प्रकरणे आणि नियुक्ती प्रक्रिया अशा विविध मुद्यांचा अभ्यास करून ह्या शिफारशी समिती सुचवेल, अशी माहिती भरती परीक्षा उच्चस्तरीय टास्क फोर्सच्या अध्यक्षा तथा सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी दिली.




भरती परीक्षा सुधारण्यासाठी गठित उच्चस्तरीय समितीने छत्रपती संभाजीनगर विभागातील विद्यार्थ्यांशी स्मार्ट सिटी कार्यालयात संवाद साधल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी समितीचे सदस्य तथा पोलीस महासंचालक सदानंद दाते, सदस्य सचिव तथा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि सदस्य तथा नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम उपस्थित होते.

श्रीमती व्ही. राधा यांनी पत्रकारांना माहिती दिली की, समितीने आतापर्यंत पुणे, नागपूर आणि अमरावती येथे विद्यार्थी व उमेदवारांशी संवाद साधला आहे. पुण्यात सुमारे ६००, नागपुरात ३५० आणि अमरावतीत ८००, अशा सुमारे १ हजार ७५० विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. तसेच समितीला २० हजारांहून अधिक ई–मेल प्राप्त झाले असून, समितीने दिलेल्या ई–मेलवर १ हजार ४०० हून अधिक जणांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून निवेदने दिली आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखतींचे निश्चित वेळापत्रक असावे, अशी प्रमुख मागणी केली आहे.

परीक्षा पद्धतीत सातत्य असावे आणि बदल आवश्यक असल्यास उमेदवारांना पुरेसा अवधी द्यावा, एकदाच नोंदणी व शुल्क आकारणी करावी, प्रश्नपत्रिकेचा दर्जा, उत्तरतालिका आणि पेपर तपासणी अधिक पारदर्शक असावी, अशा सूचना विद्यार्थ्यांनी केल्या आहेत. परीक्षा केंद्रांसाठी किमान सुविधा व निकष, पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण, निकाल व नियुक्ती प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे, तसेच एमपीएससीशी संबंधित न्यायालयीन प्रकरणे आणि भरती प्रक्रियेतील अडचणींचाही अभ्यास करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत. परीक्षा ऑनलाइन किंवा ऑफलाइन कोणत्याही पद्धतीने घेतली तरी गैरप्रकारांना प्रतिबंध करणारी सुरक्षित व्यवस्था असावी. प्रश्नपत्रिका गळती रोखण्यासाठी विविध राज्ये आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पद्धतींचा अभ्यास केला जाईल. परीक्षा केंद्रांसाठी किमान सुविधा, पर्यवेक्षकांची निवड व प्रशिक्षण, प्रश्नपत्रिका वितरण आणि परीक्षा संचालनासाठी प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करण्याबाबतही विचार करण्यात येणार आहे. विविध सत्रांतील परीक्षांसाठी सामान्यीकरणाची पद्धत स्पष्ट असावी, यासाठी संबंधित संस्थांच्या पद्धतींचा अभ्यास केला जाईल. परीक्षा रद्द करण्याची परिस्थिती निर्माण झाल्यास त्यासाठी स्पष्ट कार्यपद्धती असावी आणि निवड झालेल्या उमेदवारांचे हित सुरक्षित राहावे, याचाही विचार केला जाणार आहे. निकाल, प्रतीक्षा यादी आणि नियुक्त्या वेळेत पूर्ण करण्यासोबतच परीक्षा प्रक्रियेतील विलंब कमी करण्यासाठी उपाययोजनांचा अभ्यास केला जाईल. परीक्षा वेळेत न झाल्यामुळे वयोमर्यादेच्या दृष्टीने उमेदवारांचे नुकसान होत असल्यास त्याबाबतही विचार करण्यात येणार आहे.

श्री. सदानंद दाते म्हणाले, विद्यार्थ्यांनी मांडलेल्या सर्व सूचनांचे दस्तऐवजीकरण करण्यात येत आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही राज्य शासनासाठी महत्त्वाची संस्था असून, विद्यार्थ्यांच्या भावना व सूचना एकत्रितपणे विचारात घेऊन परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा अभ्यास केला जाईल. प्राप्त सूचनांच्या आधारे शासनाला अहवाल सादर करण्यात येईल. श्री. डॉ. एन. रामास्वामी यांनी सांगितले, उमेदवारांच्या पात्रतेचे निकष स्पष्ट असावेत. परीक्षा केंद्रांची किमान गुणवत्ता, पर्यवेक्षकांची निवड व प्रशिक्षण, प्रश्नपत्रिकेची गुणवत्ता तसेच परीक्षा प्रक्रियेतील सुरक्षितता यावर लक्ष देणे आवश्यक आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, परीक्षा केंद्रांचे ऑडिट आणि पेपर तपासणीची कार्यपद्धती अधिक सुरक्षित व पारदर्शक करण्याबाबतही विचार केला जात आहे.

श्री. प्रवीण गेडाम म्हणाले, विद्यार्थ्यांनी ऑनलाइन, संगणकाधारित व ऑफलाइन परीक्षा पद्धती, वस्तुनिष्ठ व वर्णनात्मक प्रश्नपत्रिका, परीक्षा केंद्रांवरील सुविधा, वेटिंग लिस्ट, ऑडिट तसेच पेपर तपासणीबाबत अभ्यासपूर्ण सूचना मांडल्या आहेत.

परीक्षा प्रक्रियेतील विविध टप्प्यांचा सखोल अभ्यास करून आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यात येतील. पुढील परीक्षेसाठी सुमारे १२ लाख उमेदवारांनी अर्ज केले असल्याने आवश्यक पायाभूत सुविधा व मनुष्यबळाचा आढावाही घेतला जाणार आहे.

समितीचा विभागनिहाय दौरा येत्या ३० सप्टेंबरला पूर्ण होईल त्यानंतर तीन महिन्यांत अहवाल पूर्ण करण्यात येणार असून, विद्यार्थी, पालक व तज्ज्ञांकडून प्राप्त सूचनांचा अभ्यास करून भरती परीक्षा व्यवस्था अधिक पारदर्शक, विश्वासार्ह, कार्यक्षम आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी शासनाला अभ्यासपूर्ण शिफारशी सादर करण्यात येतील, असे व्ही. राधा यांनी सांगितले. याप्रसंगी छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी उपस्थित होते

# मराठवाड्यात पाणीटंचाई उद्भवू नये यासाठी सूक्ष्म नियोजन करा – राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर




## पाणीटंचाई व पाणीपुरवठा योजनांचा विभागीय आढावा

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) – मराठवाड्यात यंदा सरासरीच्या तुलनेत पर्जन्यमान कमी झाले असून संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर व गावनिहाय नियोजन करावे. नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा नियमित व सुरळीत पुरवठा होईल यासाठी आवश्यक उपाययोजनांचे आतापासूनच सूक्ष्म नियोजन करावे. तसेच प्रलंबित पाणीपुरवठा योजनांची कामे गतीने पूर्ण करावीत, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात राज्यमंत्री साकोरे–बोर्डीकर यांनी मराठवाड्यातील पाणीटंचाईची सद्यस्थिती, पर्जन्यमान, उपलब्ध पाणीसाठा, संभाव्य टंचाई तसेच विविध पाणीपुरवठा योजनांचा विभागीय आढावा घेतला. यावेळी अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, अपर आयुक्त ( महसूल ) रिता मैत्रेवार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सहसचिव गीता कुलकर्णी यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे पाणीटंचाई कृती आराखडा तसेच आगामी काळात करावयाच्या अपेक्षित कार्यवाहीबाबत सविस्तर माहिती दिली.

**मराठवाड्यात सरासरीच्या ६३.४० टक्के पर्जन्यमान** – जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत मराठवाड्याचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान ६७९.५० मि.मी. असून आतापर्यंत ४३०.८० मि.मी. पाऊस झाला आहे. हे प्रमाण सरासरी वार्षिक पर्जन्यमानाच्या ६३.४० टक्के आहे. या कालावधीत अपेक्षित पर्जन्यमान ६२९.७० मि.मी. असून त्याच्या तुलनेत प्रत्यक्ष पर्जन्यमान ६८.४१ टक्के आहे.

जिल्हानिहाय छत्रपती संभाजीनगरमध्ये ४२२.३० मि.मी. म्हणजे सरासरीच्या ७२.६० टक्के, जालना ४३८.५० मि.मी. म्हणजे ७२.७१ टक्के, बीड ३३१.३० मि.मी. म्हणजे ५८.५२ टक्के, लातूर ३५१.७० मि.मी. म्हणजे ४९.८२ टक्के, धाराशिव ३३७.९० मि.मी. म्हणजे ५६.०३ टक्के, नांदेड ५८७.८० मि.मी. म्हणजे ७२.१८ टक्के, परभणी ४२०.७० मि.मी. म्हणजे ५५.२६ टक्के आणि हिंगोली जिल्ह्यात ५४३.४० मि.मी. म्हणजे सरासरीच्या ६८.३३ टक्के पर्जन्यमान झाले आहे.

**छत्रपती संभाजीनगर विभागात सध्या चारा टंचाई नाही** – छत्रपती संभाजीनगर विभागात ६ लाख ५० हजार २८२ लहान, २६ लाख ४५ हजार ७२६ मोठी आणि २० लाख ६३ हजार ४५५ शेळी–मेंढी अशी एकूण ५३ लाख ५९ हजार ४६२ पशुधन संख्या आहे. या पशुधनासाठी दररोज सुमारे २० हजार १२५ मेट्रिक टन चाऱ्याची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत विभागात ४४ लाख ८१ हजार १३६.८५१ मेट्रिक टन चारा उपलब्ध असून सध्या चारा छावणीची आवश्यकता नाही.

सध्या उपलब्ध चारा जिल्हानिहाय साधारणतः ८९ ते २१० दिवस पुरेल एवढा आहे. जालना जिल्ह्यात सर्वात कमी ८९ दिवस पुरेल एवढा चारा उपलब्ध आहे. विभागात डिसेंबर २०२६ पासून चारा टंचाई जाणवण्याची शक्यता लक्षात घेऊन आतापासून नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. रब्बी पिकांची लागवड कमी झाल्यास जिल्ह्यातील चारा टंचाई पुढे ढकलली जाऊ शकते. उपलब्ध चाऱ्यामध्ये खरीप व रब्बी हंगामातील चारा, बांधावरील, पडीक जमीन क्षेत्रावरील तसेच वनक्षेत्रातील चाऱ्याचा समावेश आहे.

राज्यमंत्री साकोरे–बोर्डीकर यांनी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन गावनिहाय कृती आराखडा तयार ठेवावा, पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, उपलब्ध जलस्रोतांचे योग्य व्यवस्थापन करावे आणि आवश्यकतेनुसार पर्यायी जलस्रोत सज्ज ठेवावेत, अशा सूचना दिल्या.

पाणीपुरवठा योजनांची प्रलंबित कामे गतीने पूर्ण करावीत. पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करावे. पाणीटंचाईसोबतच पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याच्या उपलब्धतेवरही सातत्याने लक्ष ठेवावे. संबंधित सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयातून संभाव्य टंचाईचा सामना करण्यासाठी पूर्वतयारी करावी, असे निर्देशही राज्यमंत्री साकोरे–बोर्डीकर यांनी दिले.

# शेकडो सूचनांचा पाऊस ! विद्यार्थ्यांच्या प्रत्येक प्रस्तावावर सखोल आढावा घेणार

**● परीक्षा व भरती प्रक्रियेत सुधारणांसाठी टास्क फोर्सचा २४७ विद्यार्थ्यांशी थेट संवाद !**

**●निश्चित वेळापत्रक, प्रश्न पत्रिकेची सुरक्षितता व पारदर्शक तपासणीची मागणी**

**●परीक्षा केंद्रांच्या सुविधा व तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करण्यावर भर; परीक्षा वेळेत घ्या!**

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) – राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय भरती परीक्षा टास्क फोर्सने छत्रपती संभाजीनगर विभागातील २४७ विद्यार्थ्यांशी स्मार्ट सिटी कार्यालयात थेट संवाद साधला. यावेळी परीक्षा वेळापत्रक, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका तपासणी, पदसंख्या, परीक्षा केंद्रे, निकाल, नियुक्ती, प्रतीक्षा यादी व तक्रार निवारण यासह विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी सूचना मांडल्या.





टास्क फोर्सच्या अध्यक्ष तथा सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस समितीचे सदस्य तथा पोलीस महासंचालक सदानंद दाते, सदस्य सचिव तथा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, सदस्य तथा नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे समितीचे सदस्य तथा संघ लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य एअर मार्शल अजित शंकरराव भोसले आणि सदस्य तथा आयआयटी मुंबईचे प्राध्यापक श्यामप्रसाद करगड्डे सहभागी झाले. या संवाद कार्यक्रमात सातही जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी कार्यालयांतून विद्यार्थी ऑनलाइन सहभागी झाले होते.

आज सकाळपासून विद्यार्थ्यांनी विविध गटात भेटी देत अनेक सूचना केल्या. टास्क फोर्स सदस्यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सूचनाला गांभीर्याने ऐकून घेतले. विद्यार्थ्यांनी परीक्षांचे वार्षिक वेळापत्रक निश्चित करून त्याचे पालन करावे, परीक्षा पद्धती व अभ्यासक्रमात वारंवार बदल करू नयेत आणि बदल आवश्यक असल्यास पुरेशी पूर्वसूचना द्यावी, अशी मागणी केली. विविध संवर्गांतील रिक्त पदांची संख्या वेळेत जाहीर करून उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, जलसंपदा, वैद्यकीय व दंत वैद्यकीय अधिकारी यांसह अन्य पदांची नियमित भरती करावी, अशी सूचनाही करण्यात आली. एकाच उमेदवाराची अनेक पदांवर निवड झाल्यास पदनिवड व पदाचा त्याग (ऑप्टिंग आऊट) याबाबत स्पष्ट धोरण असावे. तसेच रिक्त पदांवर प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

प्रश्नपत्रिका निर्मितीपासून छपाई, वाहतूक व वितरणापर्यंतची प्रक्रिया अधिक सुरक्षित करावी, प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या व्यक्तीलाही परीक्षेचे स्वरूप व प्रश्नपत्रिकेची माहिती मिळणार नाही, अशी व्यवस्था विकसित करावी आणि प्रश्नपत्रिका फुटीला पूर्णपणे आळा घालण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा, अशी सूचना विद्यार्थ्यांनी केली. प्रश्नपत्रिकांतील चुका व भाषांतरातील त्रुटी टाळण्यासाठी विषयतज्ज्ञांची मदत घ्यावी. राज्यसेवा मुख्य परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची ठेवावी, प्रश्नांची काठिण्याची पातळी विद्यापीठीय अभ्यासक्रमाशी सुसंगत असावी आणि गट–ब व गट–क परीक्षांतील भाषा विषय पात्रता स्वरूपाचे ठेवावेत, अशा सूचनाही मांडण्यात आल्या.

उत्तरपत्रिका तपासणी व गुणांकनासाठी समान निकष निश्चित करून परीक्षकांची गुणवत्ता व पात्रता तपासावी, अशी मागणी करण्यात आली. उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची कार्बन प्रत, प्राथमिक व अंतिम उत्तरतालिका तसेच आदर्श उत्तरे उपलब्ध करून द्यावीत आणि आवश्यकतेनुसार फेरतपासणीची सुविधा द्यावी, अशी सूचना करण्यात आली. कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२३ व राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ मधील उत्तरपत्रिका तपासणी, गुणदान व गुणांतील फरकाबाबत विद्यार्थ्यांनी आक्षेप नोंदविले. चुकीचे प्रश्न व परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी पुराव्यासह लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन व्ही. राधा यांनी केले.

ऑनलाइन परीक्षांबाबतही विद्यार्थ्यांनी विविध सूचना केल्या. संगणकाधारित परीक्षा घ्यायची असल्यास ती एकाच सत्रात घ्यावी, विविध सत्रांतील गुणांचे समायोजन टाळावे आणि सीसीटीव्ही चित्रीकरण व जैवमितीय पडताळणीसह प्रभावी नियंत्रण व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली. सुरक्षित यंत्रणा उपलब्ध होईपर्यंत ऑफलाइन, ओएमआर पद्धतीने परीक्षा घेण्याची सूचनाही करण्यात आली. पुढील एक वर्ष ऑनलाइन परीक्षा न घेता ओएमआर पद्धतीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेतल्याचे व्ही. राधा यांनी स्पष्ट केले. ओएमआर परीक्षांसाठी प्रमाणित नियमावली तयार करण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

परीक्षा केंद्रांवर स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी व योग्य बैठक व्यवस्था असावी, उमेदवारांनी अर्ज केलेल्या जिल्ह्यातच, शक्य असल्यास, परीक्षा केंद्र द्यावे आणि केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे चित्रीकरण करावे, अशी मागणी करण्यात आली. उमेदवारांच्या तक्रारी व हरकतींसाठी केंद्रीकृत ऑनलाइन व्यवस्था सुरू करून त्यांचे वेळेत निराकरण करावे, अशी सूचना करण्यात आली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अधिकृत मदत कक्ष व मार्गदर्शक व्हिडिओ उपलब्ध करून द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली.

तांत्रिक पदांसाठी किमान एक वर्षाचा अनुभव, पशुधन पर्यवेक्षकांच्या ३२२ पदांची जाहिरात व अभ्यासक्रम तातडीने प्रसिद्ध करावा, तसेच मोटार वाहन निरीक्षक, सहायक मोटार वाहन निरीक्षक, औषध निरीक्षक व अन्य तांत्रिक पदांच्या प्रश्नपत्रिकांचा दर्जा सुधारावा, अशी मागणी करण्यात आली. वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पात्रतेनुसार अधिक संधी द्याव्यात. अभियांत्रिकी तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पदांसाठीच्या पात्रता अटींचा पुनर्विचार करावा, अशी सूचनाही करण्यात आली. कृषी सेवा गट – अ, गट – ब व गट – क पदांची एकत्रित जाहिरात तसेच गट – ब व गट – क संवर्गांसाठी सामायिक परीक्षा घेण्याची मागणी करण्यात आली.

शिक्षक भरतीच्या परीक्षेत बालमानसशास्त्राला प्राधान्य देण्यात यावे, विषयानुसार स्वतंत्र प्रश्नपत्रिका तयार करावी आणि उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची प्रत उपलब्ध करून द्यावी, अशी सूचना करण्यात आली. कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व विभागीय पोलीस उपनिरीक्षक पदांच्या परीक्षा नियमितपणे घ्याव्यात आणि संभाव्य रिक्त पदांची माहिती वेळेत जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली. पोलीस भरतीतील १ हजार ६०० मीटर धावण्याच्या चाचणी पद्धतीचा पुनर्विचार करून मृत्यू झालेल्या उमेदवारांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणीही विद्यार्थ्यांनी केली.

आरक्षण, प्रमाणपत्रे व विविध योजनांबाबतही सूचना करण्यात आल्या. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आरक्षणातील अडचणी दूर कराव्यात, खेळाडू प्रवर्गातील प्रमाणपत्रांची काटेकोर पडताळणी करावी आणि सारथी, बार्टी, महाज्योती व टीआरटीआयच्या योजनांमध्ये पारदर्शकता वाढवावी, अशी मागणी करण्यात आली. सीईटीमार्फत अभियांत्रिकी व वैद्यकीय अभ्यासक्रमांना प्रवेश घेताना जात पडताळणी प्रमाणपत्राच्या विलंबामुळे अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी प्रलंबित प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी सूचनाही करण्यात आली. प्राध्यापक भरतीतील आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांची स्वतंत्र चौकशी करण्याची आवश्यकता असल्याचे व्ही. राधा यांनी सांगितले.

एमपीएससीचे मनुष्यबळ, तांत्रिक क्षमता व संस्थात्मक रचना बळकट करावी, अध्यक्ष व सदस्यांची रिक्त पदे तातडीने भरावीत आणि परीक्षा, निकाल व नियुक्तीची प्रक्रिया निश्चित वेळेत पूर्ण करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. तमिळनाडू व गुजरात लोकसेवा आयोग तसेच संघ लोकसेवा आयोगाच्या कार्यपद्धतींचा अभ्यास करून महाराष्ट्रासाठी उपयुक्त सुधारणा करण्याचे काम सुरू असल्याचे व्ही. राधा यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सूचनांसोबत तज्ज्ञांची मते विचारात घेऊन परीक्षा प्रक्रियेची गुणवत्ता, सुरक्षितता व विश्वासार्हता वाढविण्यासाठी आवश्यक निर्णय घेतले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्याच्या भरती परीक्षा प्रणालीचा सर्वंकष आढावा घेऊन आवश्यक सुधारणा सुचविणे हे टास्क फोर्सचे उद्दिष्ट आहे.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध विभागांतील रिक्त पदे पुनरुज्जीवित करून नियमित भरती करण्यासोबतच जाहिरातीपासून नियुक्तीपर्यंतची प्रक्रिया निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्याची मागणी केली. प्रश्नपत्रिकांतील चुका व संदिग्ध प्रश्न टाळण्यासाठी स्वतंत्र छाननी व्यवस्था, उत्तरतालिकेतील पारदर्शकता, तक्रारींच्या निवारणासाठी अपीलीय प्राधिकरण आणि प्रश्नपत्रिका गळतीच्या तक्रारींची सीसीटीव्ही चित्रीकरणासह सखोल चौकशी करण्याच्या सूचना करण्यात आल्या. विविध तांत्रिक पदांच्या पात्रता अटींचा पुनर्विचार, आरक्षणातील अनुशेष भरणे, जात व खेळाडू प्रमाणपत्रांची काटेकोर पडताळणी, तसेच ऑनलाइन परीक्षांतील तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणीही विद्यार्थ्यांनी केली.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रास्ताविकात सांगितले की, ९ ते १८ सप्टेंबरदरम्यान भरती परीक्षा सुधारणांसंदर्भात ३ हजार ६९४ निवेदने व ९ हजार ६९४ ई–मेल प्राप्त झाले आहेत. त्यापैकी सुमारे ३ हजार ४३२ ई–मेलला प्रशासनाकडून उत्तरे देण्यात आली आहेत. प्राप्त सूचना व निवेदनांचे ६० विषयांमध्ये वर्गीकरण करण्यात आले असून, त्याआधारे सादरीकरण तयार करण्यात आले आहे. स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी, नुकतेच उत्तीर्ण झालेले उमेदवार व नवनियुक्त कर्मचाऱ्यांकडूनही सूचना घेण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., सह आयुक्त मंजुषा मिसकर आदी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# सायबर सुरक्षेसाठी ‘थिंक बिफोर क्लिक, व्हेरिफाय बिफोर ट्रस्ट’चा अवलंब करा




**खुलताबाद येथे लोकसंवाद अंतर्गत सायबर जनजागृती; नागरिकांना ऑनलाइन फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन**

छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) – इंटरनेट, मोबाईल आणि सोशल मीडियाचा वाढता वापर लक्षात घेता नागरिकांनी ऑनलाइन व्यवहार करताना अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे. कोणतीही लिंक, ॲप किंवा एपीके फाइल उघडण्यापूर्वी विचार करा, मिळालेल्या माहितीवर विश्वास ठेवण्यापूर्वी तिची पडताळणी करा आणि ऑनलाइन असताना सतर्क राहा, असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक सतीश बडे यांनी केले. छत्रपती संभाजीनगर जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आयोजित ‘लोकसंवाद–२०२६’ उपक्रमांतर्गत श्री शेतकरी मराठा गणेश मंडळ, मोठी कुणबी आळी, खुलताबाद येथे सायबर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना सतीश बडे बोलत होते. यावेळी मंडळाचे अध्यक्ष तथा नगरसेवक परसराम बारगळ यांच्यासह गणेश।मंडळाचे पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस उपनिरीक्षक सतीश बडे यांनी "Think Before Click, Verify Before Trust आणि Alert Online' हे सायबर सुरक्षेचे तीन महत्त्वाचे नियम नागरिकांनी दैनंदिन जीवनात अंगीकारावेत, असे आवाहन केले.

**अनोळखी लिंक व APK फाइलपासून सावधान** – अनोळखी क्रमांकावरून आलेल्या लिंक, अझघ फाइल, आकर्षक संदेश किंवा संशयास्पद ऑफरवर तात्काळ विश्वास ठेवू नये. वाहतूक दंड, वीज बिल, केवायसी अपडेट, बँक खाते बंद होणे अशा विविध कारणांचा वापर करून नागरिकांना फसविण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे कोणतीही फाइल किंवा लिंक उघडण्यापूर्वी ती अधिकृत स्रोताकडून आली आहे का, याची खात्री करणे आवश्यक आहे. पोलीस हवालदार गणेश घोरपडे यांनी नागरिकांना सोशल मीडिया, बनावट लिंक, संशयास्पद ॲप्स आणि फसव्या संदेशांपासून सावध राहण्याचे आवाहन केले. केवळ मोबाईल किंवा अँटीव्हायरसच्या सुरक्षेवर अवलंबून न राहता स्वतःची जागरूकता आणि सतर्कता अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

**आकर्षक ऑफर आणि गुंतवणुकीच्या आमिषाला बळी पडू नका** – ऑनलाइन गुंतवणुकीत मोठा परतावा, कमी किमतीत महाग वस्तू, घरबसल्या मोठी कमाई, पैसे दुप्पट करण्याचे आमिष किंवा अनोळखी व्यक्तींकडून येणाऱ्या आकर्षक ऑफर याबाबत नागरिकांनी सावध राहावे. कोणतीही ऑफर स्वीकारण्यापूर्वी संबंधित कंपनी, संस्था किंवा व्यक्तीची अधिकृत माध्यमातून पडताळणी करावी. ‘आकर्षक दिसते म्हणून खरे असेलच असे नाही’, हा नियम ऑनलाइन व्यवहारात लक्षात ठेवावा.

**पालकांनी मुलांच्या ऑनलाइन वापरावर लक्ष ठेवावे** – लहान मुले व तरुणांचा इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वाढता वापर लक्षात घेता पालकांनी त्यांच्याशी नियमित संवाद साधावा. अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन संपर्क, संशयास्पद लिंक, गेमिंगच्या माध्यमातून होणारी फसवणूक, सोशल मीडिया अकाउंटची सुरक्षितता आणि वैयक्तिक माहिती शेअर करण्याचे धोके याबाबत मुलांना माहिती द्यावी, असेही यावेळी सांगण्यात आले.

**फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० वर संपर्क** – सायबर गुन्हा किंवा ऑनलाइन आर्थिक फसवणूक झाल्यास लाज, भीती किंवा बदनामीच्या कारणामुळे घटना लपवून ठेवू नये. आर्थिक फसवणूक झाल्यानंतर तातडीने १९३० या राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा तसेच संबंधित बँक व पोलिसांना माहिती द्यावी. वेळेत तक्रार केल्यास पुढील कार्यवाहीसाठी आवश्यक प्रक्रिया लवकर सुरू करता येऊ शकते.

**पोलीस विभागाचा सायबर जनजागृतीवर भर**– माननीय पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव आणि पोलीस निरीक्षक कुमारसिंग राठोड यांच्या संकल्पनेतून नागरिकांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी पोलीस विभागामार्फत विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सायबर पोलीस स्टेशनच्या पुढाकाराने खुलताबाद येथे नागरिकांना सायबर सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक नागरिकाने "Think Before Click, Verify Before Trust आणि Alert Online' हे तीन नियम आपल्या दैनंदिन इंटरनेट वापराचा भाग बनवावेत आणि स्वतःसोबत कुटुंबीय व परिचितांनाही सायबर सुरक्षिततेबाबत जागरूक करावे, असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक सतीश बडे यांनी केले.